# "साधे जीवन" विषयी...

चंगळवाद या विषयावर सध्या अनेक गोष्टी लिहिल्या बोलल्या जात आहेत. आपल्यापैकी अनेकांना आपण स्वतः चंगळवादी आहोत हेच मुळात माहीत नाहीये. ऊर्जेच्या वापराचा अतिरेक, बहुराष्ट्रीय कंपन्यांना व्यक्तिगत आणि कौटुंबिक आयुष्यात मिळालेलं महत्वाचं स्थान, खरेदीचा अट्टाहास, गरज नसणाऱ्या वस्तूंचा संग्रह, कुटुंबातल्या व्यक्तींच्या इच्छा (गरजा नव्हेत) भागवण्यासाठी कमावत्या व्यक्तींची होणारी फरपट ही सगळी लक्षणं चंगळवाद या रोगाचीच आहेत.

साडेतीन दशकांपूर्वी इंजिनिअरिंग कॉलेजमधे शिकत असताना (त्यावेळी शिक्षणाचा दर्जा चांगला असूनही) आणि त्या नंतर तंत्रज्ञान क्षेत्रात काम करताना, मला सतत एक प्रकारची निराशा आणि असमाधान वाटत आलं आहे. त्याचं कारण आताआता पर्यंत कळत नव्हतं. मी आपली पस्तीस वर्षं आधीच मोठ्या असणाऱ्या कंपन्यांना आणखी मोठं करण्यात घालवली, काही व्यक्तींना जगात सर्वात श्रीमंत बनवण्यात घालवली. सर्वात वाईट म्हणजे छोट्या लोकांना आणखी छोटं करण्यासाठी ही वर्षं खर्च केली. माझ्या पिढीनं तंत्रज्ञांना कारकून बनवलं, कारकुनांना हमाल केलं आणि हमालांना गुलाम ! हे सगळं करणं आवश्यक नव्हतं. वस्तूंचे ढिगारे आणि ऊर्जेचा धूर माणसाचं जीवन समृद्ध करतात असंच शिकवलं जात होतं, आहे. त्याला पर्याय होता पण तो मला माहीत नव्हता. "साधे जीवन" हा तो पर्याय आहे.

दोन पुस्तके या माझ्या इंटरनेटवरच्या लेखात मी श्री. दिलीप कुलकर्णी यांच्या दोन पुस्तकांबद्दल लिहिलं आहे. ऊर्जेच्या वापराचा अतिरेक आणि विकासाचा भ्रमाचा भोपळा अशा दोन गोष्टींबद्दल त्यांचे विचार या पुस्तकांत आहेत.

कोकणात जसे आपले दिलीप कुलकर्णी जगताहेत तसेच ऑस्ट्रेलियात सॅम्युअल अलेक्झांडर आणि टेड ट्रेनर. त्यांचे विचार आणि जीवनपद्धती मराठीत वाचण्यासाठी उपलब्ध व्हावी म्हणून त्या दोघांच्या एका पुस्तिकेचं मराठी भाषांतर मी केलं आहे.

“साधे जीवन” ही पुस्तिका वाचल्यावर तुमच्या मनात अनेक विचार निर्माण होतील. ते व्हावेत हाच ती पुस्तिका भाषांतरित करून तुमच्यापुढे मांडण्यामागचा उद्देश आहे.

- आपले ऋषी मुनी असेच तर जगत होते. मग या पुस्तिकेत नवं असं काय आहे ?
- अहो वर्तमानात जगा, बैलगाडीच्या युगात आता परत का जाता ?
- ही कम्युनिस्ट विचारसरणी आहे. दूर राहा यांच्या पासून.
- सगळं कसं मस्त चाल्लंय्. कशाला आता आदिमानवासारखं जगायचं ?
- हे परदेशातल्या लोकांसाठी ठीक आहे तेच पूर्वीपासून चंगळ करताहेत. आम्हाला मस्त, चांगलं जगू द्या की जरा.
- इस्रायल मधे किबुट् होतेच की. अजूनही असतील. तसंच आहे हे सगळं.
- फार आदर्शवादी आहे हे सगळं. असं कधी करता येणार नाही प्रत्यक्षात.

असे विचार आपल्या मनात आले तर त्याचा अर्थ एकच. “साधे जीवन” जगण्याची आपल्यात हिम्मत नाहीये, आपण सबबी शोधतो आहोत, असा. “साधे जीवन” या मार्गानं जाण्यासाठी आपण एकेक पाऊल टाकायला सुरुवात केली तरच पुढच्या पिढ्यांसाठी आपण काहीतरी करतोय असं म्हणता येईल.

पण, ” हे करून पहाण्यासारखं आहे. एक पाऊल टाकून पाहूया ” असा विचार मनात आला, तर मग तुम्ही आमच्या बिरादरीत सामील झालात! चला एकेक पाऊल टाकत सगळे मिळून पुढे जाऊया.

मी या पुस्तकाचं भाषांतर करण्याचं कारण, मला त्यात आजच्या अनेक अडचणींवरचे उपाय सापडले. असं जाणवलं की काही वर्षांपूर्वी (हे न वाचता) मी पावलं टाकायला सुरुवात केली होती. या साध्या जीवनाचे फायदे मी काही प्रमाणात अनुभवले आहेत. अनेकांना असं साधं जीवन स्वीकारण्याची इच्छा आहे. पण नेमकं काय करायचं हे समजत नाही. अशांसाठी या पुस्तिकेत एक कृती-आराखडाच सुचवला आहे. या सगळ्या गोष्टी करण्याच्या आहेत फक्त बोलण्याच्या, वाचण्याच्या नव्हेत. ज्यांना इंग्रजी वाचनाची इच्छा किंवा आवड नाही त्यांच्यासाठी हे भाषांतर आहे.

राज्यकर्ते बदलले, कायदे कडक झाले, तंत्रज्ञान अत्याधुनिक झालं, संपर्क सुलभ झाला तरी ताण तणाव, कष्ट, काळज्या, कमी का झाल्या नाहीत ? फक्त पहारेकरी बदलले तुरुंग तोच राहिला असं का वाटलं ? आम्ही पराकोटीचे परावलंबी झालो म्हणून.

अन्न, वस्त्र आणि निवारा या बाबतीत व्यक्ती-व्यक्तीला स्वावलंबी कसं होता येईल आणि त्याचं फळ सगळ्या समुदायाला कसं मिळेल, या बद्दल ही पुस्तिका आहे. या पुस्तिकेत केवळ तात्विक चर्चा नाही. चंगळवादाविरुद्धच्या लढ्यात सामान्य माणसाला सामील होता येईल असे काही व्यवहारी मार्ग साध्या शब्दात सुचवले आहेत. असं जीवन जगणारे टेड ट्रेनर यांचे अनुभव आणि हिशेब हा या पुस्तिकेचा उत्तरार्ध आहे. तणावहीन आयुष्य शक्य आहे पण ते जगण्याची धमक आपल्यात हवी. त्यासाठी माणसांच्या मेंढ्या करणारी बहुराष्ट्रीय प्रक्रिया नाकारता यायला हवी. नाहीतर खाटिकखाना हेच आपलं गंतव्यस्थान असेल !

एकदा भगवान बुद्धांकडे एक मनुष्य आला. आणि म्हणाला ” तुमच्या धर्मतत्वांवर मी बराच विचार केला. पण माझ्या आयुष्यात काही फरक पडला नाही.”
तेव्हा बुद्ध हसून त्याला म्हणाले, ” एका गावाला जाण्याचा रस्ता जर तुला एखाद्यानं विचारला, त्याला तू तो सांगितलास, आणि तो तिथेच त्याच्यावर विचार करत थांबला, तर तो त्या गावाला कधी पोहोचेल ?”
“तो जोवर त्या दिशेनं पाऊल टाकत नाही तोपर्यंत कधीच नाही. त्याला त्या दिशेनं सतत प्रवास करत जावं लागेल.”
“तू विचारलेल्या प्रश्नाचं उत्तरही तेच आहे. धम्म नुसता विचार करण्यासाठी नाही. तो प्रत्यक्षात, कृतीत आणण्यासाठी आहे.” बुद्ध भगवान म्हणाले.

--**प्रसाद मेहेंदळे**

---

https://shabdashakti.wordpress.com या ठिकाणी या पुस्तकाची इ-प्रत मोफत उपलब्ध आहे. आमच्याशी संपर्क साधून तुमचा प्रतिसादही तुम्ही तिथे नोंदवू शकता.

# साधे जीवन

## विषयाची ओळख

सॅम्युअल अलेक्झँडर

---------------------------------

Getting and spending, we lay waste our powers.- **William Wordsworth**

पैसा मिळवणे आणि खर्च करणे, यातच आपण आपली शक्ती वाया घालवतो.- **विल्यम वर्ड्सवर्थ**

---------------------------------------------------------------------------

आपल्या मूलभूत गरजा अन्न वस्त्र निवारा या आहेत. त्या पलीकडे कोणत्या आणि किती "गरजा" भागवल्या म्हणजे पुरेसे होईल ? अगदी स्पष्ट विचारायचं म्हणजे किती पैसे मिळवले आणि कोणत्या वस्तू आपल्या मालकीच्या असतील तर आपल्याला चांगले आणि स्वतंत्र रहाता येईल ? हे प्रश्न हल्लीच्या चंगळवादी संस्कृतीत कोणीही स्वतःला विचारत नाहीत. पण हे प्रश्न सर्वात जास्त महत्वाचे आहेत.

या प्रश्नांना सामोरं जाण्याऐवजी बरेचसे लोक त्यांचं आयुष्य चंगळवादाची न संपणारी चढण चढण्यात घालवतात. अधिकाधिक पैसा मिळवत रहाणं आणि त्यातून अधिकाधिक वस्तू विकत घेणं एवढ्याच गोष्टीत त्यांचं आयुष्य खर्च होतं. पण आयुष्याच्या शेवटी अटळपणानं त्यांना हे कळून चुकतं की ते जगलेच नाहीत. त्यांना मिळालेली आयुष्याची ही अमूल्य संधी त्यांनी केवळ वस्तू विकत घेण्यात वाया घालवलेली असते.

स्वतंत्र आणि हेतुपूर्ण जीवन हे अत्याधुनिक वस्तूंची मालकी किंवा प्रतिष्ठित परिसरात असलेलं मालकीचं घर यांच्यावर अवलंबून नसतं. उलट त्यासाठी करावे लागणारे कष्ट इतके असतात की त्यांना जीवनात करण्याच्या अनेक गोष्टी करताच येत नाहीत. उदा. मित्र, कुटुंब, समाज यांच्यात मिसळणं आणि शांतता-समाधान देणाऱ्या निर्मिती करणाऱ्या कृती. या गोष्टींसाठी श्रीमंत असणं मुळीच आवश्यक नसतं. कारण या साऱ्या गोष्टी आयुष्य आपल्याला मुक्तपणानं वाटत असतं. समृद्धी ही मनाची स्थिती आहे.

पैसा महत्वाचा जरूर आहे, पण त्या महत्वाला मर्यादा आहे. अनेकांना वाटतं त्यापेक्षा खूपच कमी पैशातही सुखानं रहाता येतं. एकदा मूलभूत गरजा भागल्या की मग पैशाच्या मागे धावण्यामुळे आपण हेतुपूर्ण आणि प्रेरणादायी जीवनापासून लांब जातो. प्राचीन तत्ववेत्त्यांनी म्हटल्याप्रमाणे, *ज्याला आपल्याकडे पुरेशा गोष्टी आहेत हे कळतं, तो श्रीमंत असतो* . या गोष्टींची मालकी असूनही त्या पुरेशा आहेत हे ज्याला कळत नाही तो गरीब असतो. चंगळवाद हा, स्वातंत्र्य आणि संपत्ती-समृद्धी बद्दलची चुकीची संकल्पना आपल्यासमोर मांडतो.

चंगळवादी जीवनशैली फक्त पोकळ आणि असमाधानकारक आहे असे नव्हे तर ही शैली आपल्या सुंदर पृथ्वीला विनाशाकडे नेते आहे आणि इथलं जीवनच धोक्यात आणते आहे. आपण ज्या कशाचा उपभोग घेतो, ते मूलतः निसर्गाकडूनच येत असतं आणि त्यातून निर्माण होणारा कचरा निसर्गाकडेच गेला पाहिजे. पण

निसर्गाला मर्यादा आहेत ! आज आपली नाजुक परिसर-संस्था (eco-system) दशकानुदशके केलेल्या चंगळीच्या ओझ्याखाली डळमळते आहे. तरीही चंगळवाद अगदी श्रीमंत देशातही वाढतोच आहे. थोडेसे थांबून आपण स्वतःलाच प्रश्न विचारला पाहिजे की, ही (चंगळवादी) जीवनशैली एकमेव मार्ग आहे का ? की याला काही पर्याय आहे?

आणि चांगली बातमी अशी आहे की होय ! याला पर्याय आहे- साधे जीवन !! या जीवनशैलीचा स्वीकार करणारे लोक, एका अभिनव सामाजिक चळवळीत सामील होत आहेत. त्यामुळे त्यांनी स्वतःहून अतिरेकी-उपभोग असलेली, ऊर्जेचा प्रचंड वापर करणारी जीवनशैली सोडून दिली आहे आणि स्वतःसाठी न्यूनतम उपभोगाचा पण उच्च दर्जाच्या जीवनशैलीचा पर्याय निर्माण केला आहे. उपभोग्य वस्तूंबरोबरच, कामाचे तासही त्यांनी कमी केले आहेत. त्यांचा पैसा ते विचारपूर्वक खर्च करतात. स्वतःचे अन्न ते स्वतःच निर्माण करतात. ते सायकल चालवतात साधे कपडे वापरतात आणि साधारणतः मॉल्समधे न जाताच आपलं आयुष्य ते साजरे करतात. चंगळवादाची दुनिया सोडून साध्या जीवनाकडे जाणाऱ्या "सत्याग्रहींची" ही पहिली तुकडी आहे. या पद्धतीनं जीवन जगून ते असं सिद्ध करताहेत की हाच स्वातंत्र्य, आनंद आणि समाधानाचा शाश्वत मार्ग आहे. या सामूहिक बदलात तुम्हीही सहभागी व्हा म्हणजे आपणे सगळे मिळून २१ व्या शतकातल्या, या सर्वात महत्वाच्या सामाजिक चळवळीची मशाल प्रज्वलित करू शकू. हे तुम्हाला दिलेलं व्यक्तिगत निमंत्रण आहे. वस्तूंचा उपभोग कमी करा आणि जीवनाचा अधिक उपभोग घ्या.

या पुस्तिकेचं उद्दिष्ट सोपं आहे. ज्या लोकांना असं कमी उपभोगाचं, साधं आयुष्य जगायचं आहे त्यांच्यासाठी आचरणात आणण्याजोगा आराखडा निर्माण करणं. साध्या जीवनात कमी गुंतागुंत, कमी कचरा, इंधनांचा किमान वापर असेल. पण या आयुष्यात, खऱ्या अर्थानं आनंद देणाऱ्या आणि प्रेरणादायी गोष्टी असतील. यातून येणारे अनुभव इतरांना मार्गदर्शक ठरतील. आणि ते इतर विचारी लोकही या उद्दिष्टांचा पाठपुरावा करायला उद्युक्त होतील. तुम्ही हे मार्ग जर प्रत्यक्षात अवलंबायला लागलात आणि त्यातला आनंद तुम्हाला समजला, अनुभवता आला, तर नव्या जीवनाचा एक नवाच मार्ग तुम्हाला गवसेल. पुढच्या प्रवासासाठी मग फक्त तुमच्या कल्पनाशक्तीचीच कमी राहील.

एक गोष्ट मात्र फार महत्वाची आहे. या पुस्तिकेच्या पहिल्या भागात, व्यवहारात आणण्याजोग्या शेकडो कल्पना मांडल्या असल्या तरी प्रत्येक कल्पनेचा अर्थ तुमच्या स्वतःच्या दृष्टिकोनातून लावायला हवा आणि त्याचं **प्रत्यक्ष आचरण व्हायला हवं**. तुमच्या वतीने इतर कोणालाच विचार करता येणार नाही हे लक्षात ठेवायला हवं. हा आराखडा केवळ या साध्या जीवनशैलीचा पाया असेल. तुम्ही केलेली कृती तुमच्या जीवनाशी सुसंगतच असायला हवी. आपल्यापैकी प्रत्येकानं आपली साधी जीवनकथा स्वतःच लिहायला हवी.

या पुस्तिकेचा दुसरा भाग म्हणजे श्री. टेड ट्रेनर यांनी लिहिलेला निबंध आहे. हा निबंध म्हणजे चंगळवादापलीकडील जीवनाचा एक आरसा आहे. अंतर्दृष्टी आणि बारीकसारीक तपशीलासह लिहिलेला हा निबंध आपल्याला आपण (व्यक्ती आणि समाज म्हणूनही) किती कमी खर्चात चांगले जगू शकतो ते सांगतो. त्यासाठी "अधिक जीवन – कमी उपभोग" या शैलीशी बांधिलकी असणं मात्र आवश्यक आहे. निबंधाचे लेखक श्री. ट्रेनर हे स्वतःच मान्य करतात की त्यांनी दाखवलेले हिशेब हे संपूर्णपणे बिनचूक नाहीत, कारण या निबंधाचा विषय हा सातत्याने चालू रहाणारा प्रयोग आहे. पण आज उपलब्ध असलेल्यापैकी साध्या जीवनाचा

तपशीलवार हिशेब सांगणारा हा एकमेव निबंध आहे. विविध तपशील पुरवत, ट्रेनर असं सिद्ध करतात की विकसित जगाला त्यांच्या दरडोई उत्पन्नाच्या केवळ १० टक्के खर्चात असं जीवन जगता येईल. हा दावा सकृद्दर्शनी हास्यास्पद वाटला तरी खुल्या मनाने विचार करा. कारण श्री. ट्रेनर स्वतःच असं साधं जीवन गेली अनेक दशकं जगत आले आहेत. त्यामुळे अशी जीवनशैली जगाला कुठे घेऊन जाऊ शकेल याचं भाकित करणं त्यांनाच शक्य आहे. त्यांनी केलेले विश्लेषण मूलगामी आहे. त्यामुळे ते तुम्हाला कदाचित पटणारही नाही. पण ते तुम्हाला या नव्या जीवनशैली बद्दल विचार करायला लावतात हे नक्की.

तुम्हाला जर ही पुस्तिका उपयुक्त वाटली, किंवा इतरांना उपयोगी पडेल असं वाटलं तर ती इतरांना जरूर द्या. आता आपल्या सगळ्यांनाच नैसर्गिक संसाधनं आणि ऊर्जेच्या स्रोतांचं महत्व समजलं आहे, या पृथ्वीवर आपल्याला हळुवारपणेच चालावं लागेल हे नक्की. पण चंगळवादी संस्कृतीत राहून हे साध्य कसं करायचं हे खरं आव्हान आहे. आम्हाला अशी आशा आहे की ही पुस्तिका अनेकांना चंगळवादाकडून अशा साध्या, हिरव्यागार आणि आनंददायी जीवनाकडे नेणारी ठरेल. आताच आपल्याला अशा सम्यक् जीवनाची कल्पना असायला हवी.

एकदा ही पुस्तिका तुम्ही वाचलीत की तुम्ही www.simplerway.org या संकेतस्थळावर जा. तुमचे अनुभव, विचार, दृष्टिकोन, अडचणी आणि आनंद तिथे मांडा. हे संकेतस्थळ अशा अर्थगर्भ अनुभवांचे मोहोळ व्हावे अशी आमची इच्छा आहे. कोण्या एकट्याकडेच सर्व उत्तरं नाहीत. पण प्रत्येकाकडे काही उत्तरं नक्कीच आहेत. तुमचं योगदान त्यात फार महत्वाचं आहे. आपण सारे मिळून एक शाश्वत, न्याय्य आणि वर्धिष्णु समाज बांधू शकतो आणि ते करण्यातला आनंदही अनुभवू शकतो.

बदल करण्यासाठीची बीजं आपण आपल्याच हाती बाळगून आहोत.

# मनोभूमिका

**कृतीत आणण्यायोग्य अशी साध्या जीवनाची मूलतत्वं वाचण्याआधी मनोभूमिकेसारख्या वैचारिक गोष्टीची चर्चा करणं थोडं चमत्कारिक वाटेल. पण जीवनातला साधेपणा मूलत: मनोभूमिकेशी संबंधित असतो हे मान्य केलं पाहिजे. जर मनोभूमिका स्पष्ट नसेल तर साधेपणाला फारसा अर्थ उरणार नाही. म्हणून पुढे उल्लेख केलेल्या मुद्द्यांचा गंभीरपणे विचार करूनच आजचं आपलं जीवन साध्या जीवनात संक्रमित करता येईल.**

- दैनंदिन जीवनाला सकारात्मक दृष्टी ठेवून सामोरे जायचे आहे याचं भान ठेवा. याचा दुसरा अर्थ असा की साध्या जीवनाचा मार्ग निराशेपोटी स्वीकारायचा नाहीये. सकारात्मक दृष्टिकोन विशेषत: अडचणींच्या वेळी संकटाला तोंड देताना उपयोगी पडतो.
- भौतिक गोष्टींच्या उणीवेमुळे येणारे असमाधान जर तुम्ही अनुभवत असाल तर पुन्हा एकदा विचार करा. अनेकदा हे असमाधान आपल्या जीवनाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून असतं.
- राहणीमान आणि जीवनाची गुणवत्ता यांची गल्लत करू नका. उच्च राहणीमान (भरपूर वस्तूंची रेलचेल) ठराविक पायरीनंतर समाधान निर्माण करत नाही. जीवनाची गुणवत्ता वस्तूंच्या संचयावर अवलंबून नसते. म्हणून शर्यतीतून बाहेर पडा. उपभोग नव्हे जीवन जगा.
- स्वत:ला विचारा की, किती म्हणजे पुरेसं ? साधं जीवन सांगतं, पुरेसं म्हणजेच मुबलक. हेन्री डेव्हिड थोरो म्हणतात- वरवरची समृद्धी वरवरचंच समाधान आणते. किती म्हणजे पुरेसे याचे उत्तर शोधा.
- हल्ली अनेक लोक न आवडणारी कामं करतात. त्यामुळे त्यांना न आवडणाऱ्या वस्तू विकत घेता येतात. त्या वस्तूंमुळे ते त्यांना न आवडणाऱ्या लोकांवर छाप पाडू शकतात. पण मग आयुष्याच्या शेवटी लोकांवर छाप पाडणे त्यांना नकोसे वाटते. साधे रहा आणि फक्त स्वत:वरच छाप पाडा. आपली प्रतिष्ठा इतरांवर अवलंबून नाही हे ध्यानात ठेवा. हा दृष्टिकोन खोट्या प्रतिष्ठेच्या तणावातून मुक्तता देईल.
- आपण मृत्युशय्येवर आहोत अशी कल्पना करा. मग कळतं की, आपल्याकडे काय काय वस्तू आहेत या पेक्षा आपले लोकांशी संबंध कसे आहेत, आपले जीवनातले अनुभव कोणते होते हे महत्वाचं आहे. म्हणून वस्तू नव्हे व्यक्ती आणि अनुभवांसाठी जगा.
- आत्ता असलेल्या परिस्थिती संबंधी कृतज्ञ रहा. कमी संचय अधिक आयुष्य घेऊन येतो.
- हेतुयुक्त जीवन जगा. चंगळवादी शैली सोडण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. या पुस्तिकेतले मुद्दे नियमाने वाचत रहा.

# पैसा

**केवळ खर्च कमी करणं किंवा उपभोग कमी करणं म्हणजे साधं जीवन नव्हे. ती एक मनोभूमिकाही आहे. त्याशिवाय, बाजारू जगात हुशारीनं खर्च करणं याचाही साध्या जीवनात मोठा वाटा असतो.**

- मतदान केल्याप्रमाणे पैसा खर्च करा. याचा अर्थ, गंभीरपणे विचार करून खर्च करा. कोणतीही खरेदी बाजाराला संदेश देत असते हे ध्यानात ठेवा. खरेदी न केल्यानंही बाजारात संदेश जातच असतो. आपण वेगळ्या तऱ्हेनं पैसा खर्च केला तर पैशाची ताकद आपण अधिक परिणामकारक रित्या वापरू शकतो. त्यामुळे जग बदलता येते.

- स्थानिक बाजारातून खरेदी करा. जैविक समतोल साधणारी खरेदी करा. उत्पादकावर अन्याय न करणारी खरेदी करा. पृथ्वीवर अन्याय न करणारी खरेदी करा. ही खरेदी काही वेळा थोडी अधिक महाग असू शकते. पण हे आव्हान स्वीकारावं लागतं. पण "हरित उत्पादनाच्या" जाहिराती लावून तोच चंगळवाद आपल्यापर्यंत पोचवला जाऊ शकतो. त्यापासून सावध रहा. कारण हरित चंगळवादही शेवटी चंगळवादच आहे.

- पैसा मिळवण्यासाठी वेळ द्यावा लागतो. तुमची मिळकत आणि खर्च नेमका किती आहे याचा पूर्ण अभ्यास करा. हा अभ्यास नसेल तर पैसा मिळवण्याचा वेळ वाया जाऊ शकेल.

- एक महिन्याचा आय-व्ययाचा प्रयोग करा. म्हणजेच एका महिन्यात तुमची मिळकत किती आणि तुम्ही किती आणि कशा प्रकारे पैसा खर्च करता याची संपूर्ण तपशीलासह नोंद ठेवा. त्याला १२ नं गुणा. म्हणजे तुम्हाला तुमच्या वार्षिक उलाढालीचा अंदाज येईल. यावरून कोणत्या गोष्टींमधे तुम्ही बचत करू शकता ते ठरवता येईल. अशी बचतीमुळे वाचणारी रक्कम वर्ष अखेरीला बरीच मोठी असते.

- दर आठवड्याला काही पैसा वाचवण्याचे उद्दिष्ट ठेवा. हे एक आव्हान असू शकते. ते स्वीकारा आणि त्याचा आनंद लुटा.

- तुमच्या मिळकतीपेक्षा तुमचा खर्च कमी राहू दे. याचा दुसरा अर्थ बाजार तुम्हाला "गिऱ्हाइक" बनवू शकत नाही असाही होतो.

- पगारवाढ झाली की लगेच खर्च वाढवू नका. ही वाढ तुमच्या बचतीतली वाढ ठरू दे.

- तुमच्याकडे पैसे नसतील तर खरेदी करू नका. कर्ज टाळा. डेबिट कार्ड वापरू नका.

- बहुतेक सगळ्यांनाच असं वाटत असतं की माझे खर्च योग्य आणि वास्तविक आहेत. त्यांचा पुनर्विचार करा. खर्च कमी करून किंवा जास्त चातुर्यानं करून तुम्ही तुमच्या कामाचा वेळ कमी करू शकाल.

# काम आणि कामाचा वेळ

**कामाचं स्वरूप आणि कामाचा वेळ यांचा पुनर्विचार हा साध्या जीवनाच्या केंद्रस्थानी आहे. आपण उपभोग घेतो अशा बहुतेक गोष्टी आपल्याला विकत घ्याव्या लागतात. याचा अर्थ असा की जास्त उपभोग्य वस्तू म्हणजे कामाचा वेळ जास्त. म्हणजेच आयुष्याचा आनंद कमी.**

- कामाचे तास कमी करता येतील का याचा विचार करा. प्रत्येकाची परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे कामाचे तास कमी होणं हे व्यक्ती-कुटुंबानुसार बदलेल. तुम्ही जर उपभोगाच्या वस्तू कमी केल्यात तर कामाचे तास कमी करता येणं शक्य आहे. मिळालेल्या मोकळ्या वेळात तुम्ही तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी करू शकता. समाजात मिसळू शकता. यामुळे कदाचित तुमची संपत्ती कमी होईल पण जीवनाचा दर्जा निश्चित उंचावेल.

- अर्धवेळ काम करून भागत असेल तर तसं नवं काम स्वीकारा. किंवा आताच्या मालकाला विचारून कमी वेळ कमी पगारात काम करा. तुम्हाला कमी पगार द्यायचा असल्यामुळे मालक कदाचित याला तयार होईल. तुमची कार्यक्षमताही त्यामुळे वाढेल.

- पगारवाढी ऐवजी कामाचा वेळ कमी करून मागा. आठवड्याला सहा ऐवजी पाच दिवसांवर आलात, तर तुमचा वेळ वाचेल आणि इंधनावर तुम्ही त्याप्रमाणात कमी अवलंबून रहाल.

- शक्य असल्यास घरूनच काम करा. त्यामुळे इंधन, श्रम आणि वेळेची बचत होते.

- काही कामं ही सामाजिक व पर्यावरणदृष्ट्या पूरक नसतात. अशी कामं स्वीकारण्याऐवजी, कमी मोबदला देणारी सामाजिक व पर्यावरणदृष्ट्या पूरक कामं स्वीकारा.

- आयुष्य म्हणजे केवळ वेळ आहे. तो वाया घालवू नका. तुमची प्रत्येक कृती काही वेळ घेत असते. त्याच प्रमाणे समाजाला काही संदेश देत असते. हेही एक प्रकारचं मतदानच आहे.

# अन्न

**अन्न ही जीवनातली एक मूलभूत गरज आहे. अगदी काहीच दशकांपूर्वी आपले पूर्वज स्वतःचं अन्न स्वतःच बनवत होते. आपण मात्र ही जबाबदारी बाजारावर टाकली आहे. पण बाजाराचा उद्देश आपल्याला चांगलं पोषक अन्न देणं हा नसून भरपूर नफा मिळवणं हा आहे. अन्न-धान्याचं उत्पादन स्थानिक पातळीवर आणणं हा साध्या जीवनातला महत्वाचा भाग आहे.**

- जितकं जमेल तितकं, आपलं अन्न-धान्य, भाज्या स्वतःच तयार करा. तुम्ही काही सगळंच धान्य किंवा सगळ्या भाज्या स्वतः बनवू शकत नाही. पण परसबागेत किंवा गॅलरी-गच्चीतल्या कुंडीबागेत थोडे तरी उत्पादन काढू शकता. स्वतःची भाजीबाग ही साध्या जीवनातली एक क्रांतिकारी कृती आहे.
- हिरवळीच्या ऐवजी भाजी लावा. जर जागा असेल तर फळझाडं लावा. कोंबड्या पाळा.
- जर तुमच्याकडे भाजी बागेसाठी जागा कमी पडत असेल तर जवळपास कुठे सामुदायिक परसबाग आहे का ते पहा. त्यात भाजी लावा.
- जर जवळपास सामुदायिक परसबाग नसेल तर चारपाच जण एकत्र येऊन गट तयार करा आणि सामुदायिक परसबाग सुरू करा. यापेक्षा जास्त मोठी देणगी तुम्ही समाजाला देऊच शकत नाही.
- कुणीही आपल्या बागेत सगळ्या भाज्या पिकवू शकत नाही. त्यामुळे स्थानिक शेतकरी-भाजी विक्रेत्यांशी संपर्कात रहा. कोणत्याही परिस्थितीत, सुपरमार्केट मधून भाजी घेणे टाळा.
- आपण आपल्या शरीरात कोणत्या गोष्टी ढकलतो आहोत याचं भान ठेवा. आरोग्यपूर्ण, सेंद्रिय भाजीपाला व अन्न-धान्य खा. एकुणातच कमी खा. तेलकट, कृत्रिम आणि प्रक्रिया केलेलं अन्न खाणं टाळा.
- मांस, दुग्धजन्य पदार्थ आणि मासे यांनी युक्त आहार बंद करा. ते शक्य नसेल तर हा आहार किमान पातळीवर आणा. त्यासाठी आठवड्यात फक्त दोन दिवस हा आहार करण्यापासून सुरुवात करा.
- पूर्णपणे शाकाहारी बना (दूधही टाळा). हे सगळ्यांना जमेल असं नाही. पण त्यामुळे आपल्या शरीरावर आणि निसर्गावर सकारात्मक परिणाम होत असतो. यामुळे पैसेही वाचतील. मांस देणारे बहुतेक सगळे प्राणी शाकाहारी असतात. शाकाहारावर पोसलेले त्यांचे मांस खाण्याऐवजी शाकाहारच केलेला बरा. त्यामुळे मधली एक प्रक्रिया वाचते.
- आपली ब्रेड, पोळी, भाकरी आपण स्वतःच बनवा. जे अन्न-धान्य-भाजी टिकवून ठेवावे लागते आणि शक्य आहे, ते नैसर्गिक रसायने वापरून वा इतर प्रक्रियांनी (उदा. उन्हात वाळवणे) टिकवून ठेवा आणि नंतर खा.

# वाहतुक

**साधे जीवन आणि वाहतुक यांचा जवळचा संबंध आहे. लक्षावधी इंधन-वाहनं सध्या रस्त्यावर आहेत आणि त्यांची संख्या वाढतेच आहे. इंधन-वाहनांची ही संस्कृती पर्यावरणाला फार मोठ्या प्रमाणात मारक ठरते आहे. या संस्कृतीचा आधार तुलनेनं स्वस्त आणि मुबलक रित्या उपलब्ध तेल-इंधन हा आहे. इंधन-वाहनांच्या संस्कृतीपासून आपण लौकर सुटका करून घेतली पाहिजे.**

- सायकल चालवा. इंधन वाहन बहुतांशी छोट्या अंतरासाठी वापरले जाते. तेवढ्या अंतरासाठी स्वयंचालित वाहनाची गरजच नसते. जास्तित जास्त वेळा सायकल वापरा.
- आपल्या सायकलला, पुढे आणि मागे, दिव्यांची सोय करा. विशेषतः कमी उजेडात चालवताना, चकचकीत परावर्तक जाकीट घालणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक चांगले होईल. ही खरेदी लौकरच वसूल होते.
- पावसात सायकल चालवता येईल असा रेनकोट टोपी विकत घ्या. अनेकदा पावसात रेनकोट टोपी घालून सावकाश सायकल चालवणं आनंददायक असतं.
- मालाची ने आण करण्यासाठी एखादी चांगली टोपली सायकलला बसवून घ्या. चांगलं दप्तरही मागे कॅरीयरला लावता येतं.
- लहान मुलांची सायकलला बसवण्यासारखी सीट मिळते. ती पटकन काढता जोडता येते. तिचा वापर करा. तुमच्या छोट्या मुलांना या सीटमधे बसून "धाडसी" सफर करणं नक्कीच आवडेल.
- सायकल चालवून तुम्हाला (मोफत) व्यायामही मिळतो. तुम्ही निरोगी आणि कणखर बनता. चालवण्याची प्रक्रिया तुम्हाला मानसिक तणावापासूनही मुक्त ठेवते. इंधन वाहन न चालवण्यानं पैसेही वाचतात ते वेगळेच.
- जेव्हा कडक ऊन्ह असेल किंवा फार पाऊस असेल, अंतर खूप असेल त्यावेळी सायकल ऐवजी सार्वजनिक वाहन (रिक्षा किंवा बस) वापरा.
- तुमच्याकडे जास्त इंधन-वाहनं असतील तर किमान एक इंधन वाहन विकून टाका. त्यातल्या काही पैशातून सायकल विकत घ्या.
- तुम्हाला शक्य असेल तर तुमची सर्व इंधन वाहनं विकून टाका. सार्वजनिक वाहनं आणि सायकल हीच तुमच्या वाहतुकीची साधनं असू द्या.
- इंधनवाहन वापरणं आवश्यकच असेल तर त्यावेळी इतर कोणाला लिफ्ट देता येते का ते पहा. कामात कामं करा. प्रत्येक कामासाठी वेगवेगळ्या ट्रिप्स करू नका.
- विमान वाहतुक टाळा. विमानं मोठ्या प्रमाणात हवेचं प्रदूषण करतात. हवाई वाहतुकीला नाही म्हणणं आव्हान असतं. पण ते स्वीकारा आणि प्रत्यक्षात आणा. रेल्वे गाडीचा पर्याय सोयिस्कर असेल तर तोच वापरा.

# निवारा

**घर विकत घेणं, भाड्यानं घेणं किंवा बांधणं यापैकी काहीही खूपच खर्चिक असतं. तो आयुष्यातला (एकदाच होणारा) मोठा खर्च असतो. म्हणून "साधे जीवन" जगताना, तुम्ही कसे आणि कुठे रहाता याचा फार काळजीपूर्वक विचार करावा लागतो. जीवनात, स्वातंत्र्याचा अनुभव देऊन, सोयिस्कर निवास देणारा निवारा कोणता असा प्रश्न तुम्ही स्वत:ला विचारला पाहिजे. हेन्री डेव्हिड थोरो यांचे याबद्दलचे विचार निश्चितच मार्गदर्शक आहेत. " बहुतेक लोक घर म्हणजे काय याचा विचारच कधी करत नाहीत. त्यामुळे ते आयुष्यभर गरीब राहतात. कारण त्यांना स्वत:च्या गरजेचा विचार न करता, फक्त त्यांचा शेजारी रहातो तसंच घर हवं असतं."**

- साध्या जीवनशैलीत लहान, साधे आणि ऊर्जेचा किमान वापर करणारं घर असायला हवं.
- तुम्ही जिथे राहू इच्छिता ते शहर, गाव, खेडं नीट निवडा. तुमच्या घराचं ठिकाण ठरवताना कुटुंब , मित्र, हवामान, कामाचं ठिकाण, रहाण्याचा खर्च अशा अनेक गोष्टींचा नीट विचार करावा लागेल. काही शहरांत, रहाण्याची जागा अतिशय महाग असते. त्यामुळे तुम्हाला न आवडणारं काम तुम्हाला स्वीकारायला लागू शकतं. जर आणि जिथे शक्य असेल, तिथे स्वस्त घराचा पर्याय निवडा. त्यामुळे तुमचे कष्ट कमी होतात.
- कामाच्या जवळची जागा रहाण्यासाठी निवडा किंवा राहण्याच्या जागेजवळचं काम स्वीकारा. हे नेहमी शक्य असतं असं नाही. परवडतं असंही नाही. पण हे उद्दिष्ट ठेवायला हवंच. त्यामुळे सायकल वापरून कामावर जाता येतं. शिवाय जाण्यायेण्याचा वेळही वाचतो. कामाला जाण्यायेण्याचा वेळ हा माणसाच्या जीवनातला सर्वात त्रासदायक काल असतो असं सिद्ध झालं आहे. होता होईतो हा वेळ कमी करण्याचा प्रयत्न करा.
- गरज नसलेले आणि केवळ सौंदर्यवर्धक असे वास्तूतील बदल टाळा. आपल्या घरातली प्रत्येक गोष्ट सतत कोरी करकरीत दिसली पाहिजे या भ्रमावर विश्वास ठेवू नका. तुमच्या घरातली सतरंजी, गालिचा थोडा जुना दिसत असेल किंवा भिंतीवरच्या रंगाचा,वॉलपेपरचा कुठेतरी टवका उडला असेल तर लाजायचं काही एक कारण नाही. जर वास्तूत बदल गरजेचेच असतील तर जुन्या, वापरलेल्या वस्तूंचा पुनर्वापर करून हे बदल स्वत:च करा (Do it yourself).
- समाईक घर योजना. अनेक कुटुंबं किंवा मित्र एकाच घरात राहण्याचा पर्याय काही लोक हल्ली विचारात घेतात. ज्यांच्या कडे एखादी खोली जादा आहे अशा लोकांनी या जागेत एखादा पाहुणा घेणं अशक्य नाही. निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी हा पर्यायही चांगला आहे. त्यामुळे सामुदायिक जीवनाची शक्यताही वाढते.
- जर तुम्हाला स्वत:चं घर बांधणं शक्य असेल तर निसर्गानुरुप गृहरचनेचा गंभीरपणे विचार करा. कदाचित सुरुवातीला हा पर्याय महाग वाटेल, पण काही काळातच या जादा खर्चाची (उदा. सोलर पॅनेल्स, सौर बंब, दुहेरी काचांच्या खिडक्या वगैरे) वसुली होईल. **हे घर लहानच असले पाहिजे. छोटे तेच छान असते.**

# ऊर्जा

**ऊर्जा (आणि विशेषत: खनिज तेल) हे औद्योगिक संस्कृतीचे रक्तच म्हटले पाहिजे. त्या रक्तामुळेच आजची चंगळवादी जीवनशैली शक्य होत आहे. पण ही जीवनशैली नाकारण्याची दोन कारणं आहेत. (१) इंधन (कोळसा, तेल, गॅस) जाळून हवेत ज्यादा कार्बन निर्माण होत रहातो. आणि पर्यावरणात नकारात्मक बदल होत राहतात. (२) इंधनाचा साठा मर्यादित असल्यामुळे त्याचा तुटवडा नजिकच्याच काळात निर्माण होणार आहे. त्यामुळे इंधन महाग होईल. आपण इंधन अधिक कार्यक्षमतेनं वापरायला हवं आणि शाश्वत ऊर्जेच्या वापराकडे वाटचाल करायला हवी.**

- पर्यावरणीय बदलांबद्दल आणि आगामी इंधनटंचाई बद्दल भरपूर वाचन करा. हे विषय मोठे राजकीय परिणाम घडवून आणणारे आहेत. त्यामुळे काही राजकीय पक्ष आणि प्रचार माध्यमं, वातावरण गढूळ करत राहतात. पण हे विषय राजकीय पक्षांच्या आवाक्यातले नाहीत. तुमचा दृष्टिकोन विज्ञानाधिष्ठित असू दे राजकारणावर अवलंबून नको. या बद्दल खूप वाचा. प्रश्न विचारा, स्वत: विचार करा, स्वत:च संशोधन करत रहा.

- शुद्ध (green) ऊर्जा विकत घ्या. शुद्ध ऊर्जा म्हणजे वारा, ऊन्ह, भू-उष्णता, जलऊर्जा या पासून निर्माण केलेली ऊर्जा. ही ऊर्जा आज थोडी महाग वाटेल. पण त्यावर चालणाऱ्या यंत्रणा अधिक कार्यक्षमतेच्या निवडा. अशी ऊर्जा पुरवणारी कंपनीच निवडा. नाही तर कंपनी बदला.

- ऊर्जेच्या कार्यक्षमतेचा गंभीरपणे विचार करा. याचे अनेक प्रकार आहेत. वापर नसताना उपकरणं बंद ठेवणं, अधिक कार्यक्षम दिवे वापरणं वगैरे.

- कॉमनसेन्स वापरा. थंडी असेल तर हीटर चालू करू नका त्या ऐवजी स्वेटर वापरा. आपलं शरीर आपल्याला वाटतं त्यापेक्षा अधिक कणखर असतं. बाहेर खूप गरम असेल तर आपल्या खोल्यांच्या दाराखिडक्यांचे पडदे लावून घ्या. त्यामुळे आतली जागा बऱ्यापैकी थंड रहाते.

- वीज निर्माण करणारी सौर पॅनेल विकत घ्या. सौर बंब वापरा. काही काळातच त्या पैशांची वसुली होते. शिवाय अशा वस्तू विकत घेण्यामुळे या क्षेत्रातल्या संशोधनाला चालना मिळत असते.

- काही यंत्रं नि:संशय श्रम वाचवतात. पण अनेक निरुपयोगी आणि बिनगरजेची असतात. इलेक्ट्रॉनिक आणि पेट्रोलवर चालणारी अशी साधनं नाकारा.

- एखादी यंत्रणा विकत घेताना, कमी ऊर्जा खर्च करणारी यंत्रणाच विकत घ्या. ही यंत्रं महाग वाटली तरी चालताना कमी ऊर्जा वापरून ती हा खर्च लौकरच भरून काढतात.

- विविध प्रकारचे सोलर कुकर वापरा. मंद आचेसाठी पेटी पद्धतीचा तर तीव्र आचेसाठी पॅराबोला कुकर वापरा. कदाचित थंडीत-पावसाळ्यात हे कुकर फार कामी येणार नाहीत. पण मोठ्या प्रमाणात ऊर्जा बचत करतीलच.

# वस्त्र

**प्राचीन काळी कपड्यांचा उपयोग शरीराला ऊब मिळावी आणि लज्जारक्षण व्हावं हा होता. आज कपड्यांचा उपयोग प्रतिष्ठा आणि पैसा यांचं प्रदर्शन करणाऱ्या फॅशन्स करण्यासाठी होतो आहे. लोक प्रचंड पैसा कपड्यांवर दरवर्षी खर्च करू शकतात, करतात. पण हे पूर्णपणे अनावश्यक आहे. साधे व्हा.**

- साधे, वातावरणाला साजेसे आणि मूळ हेतु साध्य करणारे कपडे वापरा हे साध्या जीवनाचे वस्त्रांविषयीचे विधान असेल. चंगळवादी समाजा प्रमाणे फॅशनला शरण जाऊ नका.
- जर आज तुम्ही झकपक कपडे घालणारे असाल, तर तुमच्या समाजातल्या प्रतिमेचा पुनर्विचार करा. साधे कपडे स्वीकारा. हा साध्या जीवनाकडे नेणारा वस्त्रबदल थरारक असतो.
- चांगले सेकंड हँड कपडे वापरा. ते तुमच्या नातेवाईकांचे असतील किंवा जुन्या कपड्यांच्या दुकानातले. असे कपडे शोधताना अचानक खजिना सापडण्याची शक्यता आहे !
- साधे कपडे वापरणे म्हणजे गबाळे राहणे नव्हे. तुमची स्वतःची वस्त्रशैली घडवा. उदा. चंगळवादोत्तर काळात वापरले जातील असे कपडे तुम्ही आजच वापरू शकता.
- कपडे उत्तम दुरुस्त करायला शिका. ही दुरुस्त करण्याची स्वतंत्र शैली निर्माण होउ शकते. मग तुम्ही शिवलेले ठिगळ किंवा दुरुस्त केलेली कॉलर हीच तुमची नवी ओळख होईल.
- तुम्ही जरा जास्त महत्वाकांक्षी असाल तर नवे कपडे शिवायला शिका. हा एक थरारक आनंददायी अनुभव असू शकतो. त्यामुळे पैसेही वाचतात.
- तुमच्या निवडक मित्रमंडळात कपड्यांची अदलाबदल करा. त्यामुळे आपोआप वस्त्रवैविध्य निर्माण होईल. खरेदी टळेल आणि एकाला निरुपयोगी वस्तू दुसऱ्याचा खजिना ठरेल.
- मोठ्या दुकानातून स्वस्त कपडे घेणे टाळा. कारण अशा दुकानात श्रमजीवींचं शोषण करून आलेला माल असू शकतो.
- करोडोंचा फॅशन बाजार अर्ध्यानं कमी झाला अशी कल्पना करा. हा पैसा शाश्वत ऊर्जा आणि संयंत्रासाठी किंवा मानवी कल्याणार्थ वापरला गेला, तर आपण फार काही गमावणार नाही. मिळकत मात्र प्रचंड होईल. इथे पैशानं "मतदान" करा.
- साधे कपडे स्वातंत्र्य बहाल करतात. झकपक कपडे घातले की आपल्या हालचालींवर बंधनं येतात. कारण ते कपडे घाण होण्याची भीती आपल्याला वाटत रहाते. साधे कपडे घातले की गवतावर लोळायला काही वाटत नाही आणि पटकन बागेत काम करायची भीती वाटत नाही. साधे कपडे घाला आणि वृत्तीत खुलेपणा आणा.

# वस्तुसंचय

**आपल्याला अन्न, वस्त्र आणि निवारा यांची सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण आयुष्यासाठी गरज असते. शिवाय प्राथमिक शिक्षण आणि आरोग्यसेवा आपल्याला हव्या असतात. पण या पलीकडे इतर कुठल्या गोष्टींची गरज आपल्याला स्वस्थ आणि स्वतंत्र रहाण्यासाठी असते का ? मूलभूत गरजांपलीकडे काही साचवायचं नाही असं काही "साधे जीवन" मागत-सांगत नाही. पण आणखी कशाकशाचा संचय करायचा या बद्दल मात्र व्यक्तीला हे जीवनाचं तत्वज्ञान प्रश्न विचारतं.**

- गरज नसलेल्या वस्तूंचा संचय करू नका. इच्छांची किमान पूर्तता हा साध्या जीवनाच्या मार्गाचा संदेश आहे. अशा वस्तू जमवायच्या ज्यांमुळे जीवनाची गुणवत्ता सुधारेल. अनेकदा वस्तू ही केवळ एक वस्तू असते. ती फक्त जागा व्यापते, पैसा आणि संसाधनं शोषून घेते. वस्तु-संचय कमी करा आयुष्य अधिक अनुभवा.
- आयुष्यातली गिचमिड कमी करा. जेव्हा जीवन साधं करायचं असतं, तेव्हा घरातल्या वस्तूंची गिचमिड कमी करणं ही पहिली पायरी असू शकते. प्रत्येक खोलीत जाऊन तिथे जादा वाटणारी वस्तू दान करून टाका. यामुळे एक प्रकारचं मानसिक समाधान मिळतं.
- वस्तूंना पिल्लं होतात हे ध्यानात घ्या. उदा. वॉशिंग मशीन आणलं की त्याचं कव्हर तुम्ही खरेदी करता. मिक्सर घेतला की नंतर त्याला जोडता येणारी जादा भांडी घेतली जातात. मुळात वस्तू कमी केल्या की ही पिल्लं जन्मतच नाहीत. लक्षात ठेवा- When in doubt, do without !
- वस्तू विकत घेण्याचं मानसशास्त्र लक्षात घ्या. अनेकदा जाहिरातीचा प्रभाव ओसरला, की घेतलेली वस्तू फार उपयुक्त नाही याचं भान येतं.
- “डिडेरॉट” परिणाम माहिती करून घ्या. “डिडेरॉट” परिणाम म्हणजे एक नवी वस्तू घेतली की इतर तत्संबंधी वस्तू जुनाट वाटायला लागतात. मग तुम्ही त्याही नव्या घेऊ इच्छिता. एक सोफा नवा घेतला की खुर्च्या नव्याच असाव्यात असं वाटतं. कधी कधी तर नालासाठी घोडाही घेतला जातो. किती म्हणजे पुरेसं ह्याचं भान आलं की हे धोके टळतात.
- अन्याय्य रीतीने उत्पादित केलेल्या (किंवा तसा संशय येईल अशा) वस्तू व माल नाकारा. कारण त्यात श्रमिकांचं शोषण करून मोठ्या झालेल्या कंपन्या फायदा मिळवतात.
- जेव्हा एखादी वस्तू हवीच असं तुम्ही विचारपूर्वक ठरवता, त्यावेळी वस्तूची गुणवत्ता पहा. गुणवत्ता म्हणजे:
    - वस्तूची उपयुक्तता आणि ती उत्पादित करण्यासाठी वापरलेली स्वच्छ ऊर्जा
    - श्रमिकांचं शोषण न करणारे उत्पादन तंत्र.
    - निसर्गावर होणारा त्याचा किमान दुष्परिणाम.

# पाणी

**पाणी हे जीवन आहे. ते म्हणजे आपली सर्वात महत्वाची साधनसंपत्ती. आगामी काळात जेव्हा वातावरण अधिक गरम होईल, लोकसंख्या वाढेल तेव्हा पाणी अधिकच मौल्यवान बनेल. आपण ते वाया जाऊ देता कामा नये. त्यासाठी या काही कल्पना-सूचना.**

- पाण्याच्या टाक्या वापरा. त्यामुळे नळसंस्थेवरचं ओझं कमी होईल. पावसाचं पाणी अधिक वापरता येईल. परसबागेत अन्न निर्माण करणं त्यामुळे अधिक सोयीचं होईल.
- घरगुती अन्न-धान्य उत्पादनात औद्योगिक शेतीपेक्षा कमी प्रमाणात पाणी वापरलं जातं. त्यामुळे परसबागेवर जोर द्या.
- पावसाचं पाणी अगदी बादली बादलीनंही साठवा, आणि वापरा. त्यामुळे लक्षावधी लिटर पाण्याची बचत होईल.
- पाण्याचा पुनर्वापर करा. स्वयंपाकाचं, कपडे धुण्याचं, अंघोळीचं पाणी पुन्हा वापरा. ते संडास साफ करायला वापरता येईल. ते बऱ्यापैकी स्वच्छ असेल तर बागेत झाडांसाठीही वापरता येईल.
- विकसित जगात संडास फ्लश करण्यासाठी आज पिण्यायोग्य पाण्याचा वापर केला जातो. फक्त लघवी केली असेल तर केवळ झाकण ठेवून दुर्गंधीला अटकाव करता येईल.
- अंघोळीसाठी मोजके पाणी वापरा. शॉवर घेत असाल तर ३ ते ४ मिनिटेच शॉवर घ्या. हे पाणी बागेसाठी पुन्हा वापरा.
- जेव्हा गरज नसेल तेव्हा नळ बंद करा. दात घासताना, दाढी करताना, चेहरा धुताना नळ सोडून ठेवण्याची काहीच गरज नसते.
- भांडी किंवा कपडे धुण्याची यंत्रं खूप पाणी वापरतात. ती गरजेचीच असतील तर पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवा.
- विकसित समाजात शुद्ध पाण्याची गरज खूप असते. त्यामुळे सरकारला पाणी शुद्धीकरणावर खूप खर्च करावा लागतो. पण आपण जर पाण्याचा वापर जपून केला, तर हा खर्च खूपच आटोक्यात आणता येईल. हा पैसा इतर चांगल्या कारणासाठी वापरता येईल.

# कचरा कमी करणे

**चंगळवादी समाजाचा सर्वात घातक परिणाम म्हणजे निर्माण होणारा कचरा. दर आठवड्याला करोडो ग्राहक कचरा रस्त्याच्या कडेला ठेवतात. तो तिथून निसर्गात पुन्हा ढकलला जातो. हे असं किती दिवस चालणार ? साधे जीवन आपली कचऱ्याच्या समस्येतून बऱ्याच अंशी मुक्तता करील.**

- **Refuse.** अयोग्य वस्तूंना नकार द्या. वस्तूंचा अयोग्य वापर करणं टाळा. उदा. प्लास्टिक बाटलीतलं पाणी पिण्याऐवजी नळाचं पाणी प्या. सध्याचे बूट चांगले असताना नवे घेणं टाळा. विमानानं जाणं टाळा. ही यादी अनंत आहे.
- **Reduce.** वस्तूंचा उपभोग कमी प्रमाणात घ्या. आपल्याला सगळ्यांनाच वस्तू घ्याव्या लागतात. ते सोडून देणं म्हणजे "साधे जीवन" नाही. त्याचं प्रमाण कमी करणं म्हणजे साधं जीवन. लक्षात ठेवा, प्रत्येक गोष्टीला इतर चांगले-साधे पर्याय असतात.
- **Reuse.** वस्तूंचा पुनर्वापर करा. गळका डबा बागेत रोप तयार करायला वापरता येतो. अशी असंख्य उदाहरणं आहेत. तुम्हाला तुमची कल्पना शक्ती मात्र वापरावी लागेल.
- **Recycle.** वस्तूंचा पुनर्जन्म होऊ दे. वापरलेले कागद कुटून त्याचा पुन्हा हात कागद बनवता येईल. अशी उदाहरणंही असंख्य आहेत. तुम्हाला तुमची कल्पना शक्ती मात्र वापरावी लागेल.
- **Compost.** निसर्गाकडे पुन्हा सोपवा. स्वयंपाकातला ओला कचरा कंपोस्ट करून पुन्हा निसर्गाकडे सोपवा. छाटलेली झाडं पुन्हा जमिनीत घाला म्हणजे हिरवं खत तयार होईल. हळूहळू तुमच्या बागेतली माती उत्कृष्ट उपजाऊ होईल.
- घेतलेल्या वस्तूचा भरपूर वापर करा. त्यांची झीज होऊ द्या. त्यांची दुरुस्ती करून पुन्हा वापरा किंवा अशा वस्तूंचा वापरच बंद करा. याला कॉमनसेन्स असंही म्हणता येईल.
- पोस्टातून येणारा कागदी कचरा, जाहिरातीचे कागद, जुन्या मासिक पुस्तकांचे कागद, निरुपयोगी वह्या या सगळ्यांचा पुनर्जन्म होउ शकतो. पण ते निर्माणच न झाले तर अधिक चांगलं.
- वस्तूंचं पॅकिंग होता होईतो टाळा. त्यामुळे अनेकदा निरुद्देश कचरा निर्माण होत असतो.
- बाजारात जाताना कापडी पिशवी जवळ बाळगा. प्लास्टिक पिशव्या देऊ नका, घेऊ नका.
- ऊर्जेचा अपव्यय टाळा. त्यामुळेही कचरा निर्माण होत रहातो.
- शाश्वत शेती - शाश्वत संस्कृती याबद्दल वाचत रहा. निसर्गाच्या सहवासात त्याला पाठिंबा देत उत्पादन करा त्याच्या विरोधात काम करत नव्हे.

# यथायोग्य तंत्रज्ञान

**तंत्रज्ञानाबद्दल "साधे जीवन" कोणती तत्वं सागंतं ? जीवन साधं करायचं म्हणजे तंत्रज्ञानाचा पूर्ण त्याग करायचा का ? अजिबात नाही ! पण तंत्रज्ञान आपल्या आयुष्यात नेमकी कोणती भूमिका बजावत रहातं याचा काळजीपूर्वक विचार करायचा. कारण तंत्रज्ञान नेहमी सकारात्मक भूमिकाच बजावतं असं नाही.**

- समाज माध्यमं: फेसबुक ट्विटर सारख्या इलेक्ट्रॉनिक समाजमाध्यमांचा विचार करायचा तर लोकांनी त्यासाठी खर्च केलेला वेळ म्हणजे त्यांच्या स्वतःच्या वेळेचा केवळ अपव्ययच म्हणावा लागेल. हा वेळ जर खऱ्या जगात त्यांनी आपल्या खऱ्या मित्रांच्या, खऱ्या कुटुंबियांच्या सन्निध्यात घालवला तर त्यांचे ताणतणाव किती तरी कमी होतील. हाच वेळ एखाद्या निर्मितीक्षम उपक्रमात घालवला तर त्या वेळेचं सोनं होईल.

- इलेक्ट्रॉनिक समाजमाध्यमांत काही चांगल्या क्षमताही आहेत. पण तो त्यांच्या संपर्कजाळयाचा सकारात्मक परिणाम आहे. आणि खऱ्याखुऱ्या माणसांचं संपर्कजाळं तर अधिक परिणामकारक असेल. ही माणसं "साधे जीवन" जगणारी असतील तर ते सर्वात जास्त सकारात्मक ठरेल.

- तुमच्या घरातलं एखादं यंत्र बंद पडलं तर एक महिना तसंच पडून राहू दे. त्या महिन्याभरात त्याची खरी गरज  तुम्हाला होती की नाही ते कळून येईल. अशा अनेक यंत्रणा थोड्याशा सोयी देतात पण त्या गरजेच्या नसतात. जर ती गरज नाही असं निदर्शनाला आलं तर ते दुरुस्तही करू नका, किंवा तसं नवं तर अजिबात आणू नका. त्यानं वेळ आणि ऊर्जेची बचत होते.

- यथायोग्य तंत्रज्ञान म्हणजे काय याचा नीट विचार करा. जर एखाद्या यंत्राचा उपयोग साध्या जीवनात सकारात्मक होत असेल तर त्याचा निश्चित स्वीकार करा. उदा. सौर विद्युत पॅनेल किंवा वायु-वीज यंत्र (विंड मिल). "साधे जीवन" म्हणजे साधू-गोसाव्याचं जीवन नव्हे. चंगळवादाकडून  साध्या जीवनात जाण्यासाठीच्या प्रक्रियेत यथायोग्य तंत्रज्ञानाला मोलाचं स्थान आहे. तंत्रज्ञानानं सर्व प्रश्न सुटतील असं नाही तर काही बाबतीत ते वाढतीलच हे ध्यानात घ्यायला हवं.

- यंत्रांची कार्यक्षमता म्हणजे सारं काही नव्हे. कार्यक्षम यंत्र आपल्याला इतर अकार्यक्षम, प्रदूषक गोष्ट करण्यासाठी उद्युक्त करू शकतं. तुलनेनं इंधन कमी वापरणारी गाडी आपल्याला मिळाली तर आपण ती वाजवीपेक्षा जास्त वापरणं अशक्य नाही. एका ठिकाणी ऊर्जा वाचवली म्हणून आपण लगेच (ऊर्जेचा अतिरेक असणारा) विमानप्रवास स्वीकारता कामा नये.

- तंत्रज्ञान जितकं साधं असेल तितकं चांगलं. लिओनार्डो दा विंची म्हणतो: "साधेपणा हा उच्च दर्जाच्या गुंतागुंतीचा परिपाक आहे”. यथायोग्य साधं तंत्रज्ञान हे उत्पादन, दुरुस्ती आणि वापर या तीनही क्रियांसाठी सोयीचं असतं.

# करमणूक आणि सामाजिक अभिसरण

**चंगळवादी संस्कृतीत करमणूक आणि सामाजिक अभिसरण हे दोनही फार मोठे व्यवसाय आहेत. लोकांना साधारणत: असं वाटतं की हातात पैसा असला की घराबाहेर पडून करमणूक विकत घेतली पाहिजे किंवा समाजात मिसळण्यासाठी खर्च केला पाहिजे. पण हे खरं नाही. करमणूक आणि सामाजिक अभिसरण यासाठी काहीही खर्च करण्याची गरज नसते. किंवा अगदी थोड्या खर्चात हे करता येतं. थोडी कल्पनाशक्ती वापरली तर हे करता येईल. खरं तर पैसा या बाबतीत महत्वाचा नाहीच. तुम्ही तुमचा वेळ आणि ऊर्जा करमणूक आणि सामाजिक अभिसरणासाठी कशी वापरता हा मुख्य विषय आहे.**

- बाहेरचं खाणं पिणं, सिनेमाला जाणं या गोष्टी साध्या जीवनात वर्ज्य नाहीत. पण हे प्रसंग मोजकेच असायला हवेत. आपली करमणूक किंवा सामाजिक अभिसरण हे विकले जाणारे उत्पादन किंवा सेवा असता कामा नये. क्वचित असं घडू शकेल पण सतत नाही.

- दूरदर्शनचे कार्यक्रम: असं आढळलं आहे की जगभर आठवड्यातले किमान २५ तास दूरदर्शनवर कार्यक्रम पाहण्यात लोक घालवतात. एका महिन्यासाठी टी.व्ही. बंद ठेवून पहा. या वेळेचा सदुपयोग करण्याच्या युक्त्या तुम्हाला आपोआप सुचतील.

- नवं कौशल्य शिका: कामाचं विभाजन (श्रम-विभागणी) हा चंगळवादी संस्कृतीचा गाभा आहे. त्यामुळे व्यक्तींची विविध कौशल्यं शिकण्याची इच्छा कमी होते. नवी कला-कौशल्यं शिकणं हा करमणुकीचा उच्च दर्जाचा प्रकार आहे. सेंद्रिय पद्धतीनं बागकाम, ब्रेड बनवणं, स्वयंपाक करणं, विटांचे बांधकाम करणं, अन्न टिकवणं, कपडे शिवणं-दुरुस्त करणं, वस्तू बनवणं, रंगवणं, पुस्तक बांधणी करणं, वाद्य वाजवणं अशी अनेक कौशल्यं आत्मसात करता येतात. टी.व्ही. पहाणं हा पराधीन बनवणारा उपक्रम आहे. त्या ऐवजी, आताच उल्लेख केलेली कौशल्यं आपल्याला कृतिशील आणि स्वावलंबी बनवतात.

- स्वत:साठीही वेळ काढा: अनेकदा सामाजिक अभिसरणासाठी आपण फारच वेळ राखून ठेवतो. त्यामुळे गर्दीत जाण्याचं, रहाण्याचं व्यसन लागू शकतं. स्वत:साठी वेळ शिल्लकच रहात नाही. हल्ली तर अनेक लोक गर्दीत इतके बुडून गेलेले दिसतात की एकटं रहाण्याची भीतीच त्यांच्या मनात उत्पन्न होते. स्वत:साठीही वेळ द्या. गरज पडली तर मिळणाऱ्या सामाजिक संमेलनांच्या निमंत्रणांना नाही म्हणा.

- तुम्हाला कशाची अतिशय आवड आहे ? त्या कारणासाठी स्वयंसेवक म्हणून कामावर रुजू व्हा. आपल्या आवडीचं काम इतरांबरोबर करताना किती आनंद मिळतो हे अनुभवून तुम्ही चकित व्हाल.

- वाचनाची आवड जोपासा. तुमच्या जवळच्या ग्रंथालयातून मोफत किंवा अल्प वर्गणीत तुम्हाला उत्तम पुस्तकं वाचता येतील. आपली शाळा-महाविद्यालय संपलं की शिक्षण संपलं असं आपण समजतो. ते खरं नाही. जगात मुक्तपणे शिकण्यासारखं खूप आहे. वाचनातून, भेटीगाठींतून हे निरंतर शिक्षण आपण मिळवू शकतो. त्यात उत्तम दर्जाची करमणूक आहे आणि सामाजिक अभिसरणही आहे.

# समाज

**अतिरेकी उपभोगाच्या आयुष्यात आपण समाजाचे भाग आहोत ही भावना जवळ जवळ नष्टच होते. आर्थिक दृष्ट्या भरारी मारणाऱ्या व्यक्ती किंवा समाज कौटुंबिक दृष्ट्या आणि सामाजिक संबंधांतही निराशा अनुभवतात. कारण त्यांचं लक्ष केवळ पैसा मिळवणं आणि वस्तूंचा उपभोग घेणं यातच अडकलेलं असतं. हा समाज व्यक्तिकेंद्री बनतो आणि अनेक अहंकारी व्यक्तिमत्वं या समाजात निर्माण होतात. त्यामुळे सामान्य व्यक्तींच्या मनात न्यूनगंड निर्माण होतात. समाज एकूणातच चिडचिडा होतो. असे समाज जर मितव्यय आणि कमी उपभोग या तत्वांवर जोर देतील तर त्यांच्यातल्या उणीवा नष्ट होतील. समाज हा बदलाचं एक अवजारच आहे. साध्या जीवनाचा स्वीकार केल्यामुळे अशा दोषमुक्त समाजाची निर्मिती होईल आणि व्यक्ती आपली सामाजिक बांधिलकी संभाळू शकतील.**

- कोणता समाज श्रीमंत समजायचा ? प्रत्येकाजवळ प्रत्येक वस्तू स्वतःची आहे असा, की सर्वजण मिळून अनेक सामायिक वस्तू वापरतात तो समाज ? सामायिक मालकी मुळे सर्वांना सोयी मिळतात पण वस्तूंचा खर्च कमी होतो. व्हॅक्युम क्लीनर काही आपण रोज वापरत नाही. हा जर सगळ्यांनी मिळून वापरला तर सगळ्यांची सोय होईल पण वस्तूवरचा खर्च कमी होईल. विचारल्यावर द्या आणि गरज पडली तर मागा हा सहकार्याचा मंत्र साध्या जीवनात उपयुक्त आहे.

- वस्तूंचा सामायिक उपयोग जितका समुदायाच्या उभारणीला पूरक आहे तितकाच कौशल्यांचा सामायिक उपयोगही. एकमेकांची कौशल्यं वापरल्यामुळे आपण चंगळवादी अर्थव्यवस्थेवर कमी अवलंबून रहातो. त्यामुळे विविध लोकांना भेटता येतं आणि अनेक पिढ्यांचा एकमेकांशी संपर्क रहातो.

- www.sharehood.org या संकेतस्थळावर शाश्वत, आनंददायक आणि टिकाऊ समुदाय तयार करायला मदत केली जाते. आपल्या शेजाऱ्याची ओळख करून घ्या आणि त्याच्या समवेत अनेक गोष्टी करा हा संदेश इथे दिला जातो. असे समुदाय एकत्रितपणे आपल्या गरजा भागवतात आणि इतरांनाही असे समुदाय बनवायला मदत करतात. या संकेतस्थळाला जरूर भेट द्या आणि असा समुदाय आपल्या जवळपास बनवा.

- चित्रपट उपक्रमः दुपारी किंवा रात्री, ज्यावेळी अनेक लोक एकत्र येऊ शकतात अशा वेळी सर्वांनी मिळून चित्रपट पहाण्याचा उपक्रम समुदाय निर्माण करायला उपयोगी पडेल. अशा उपक्रमाची योग्य प्रकारे जाहिरात करून लोकांना एकत्र करता येईल. "Home","Power of community","End of suburbia","Life after growth" असे यू-ट्यूब आणि व्हिमिओवरचे चित्रपट पहाता येतील. त्यानंतर चर्चा आणि चहापान होईल.

- गाव बदलण्याची चळवळ (Transition Town Movement) म्हणजे प्रदूषण आणि इंधनटंचाईला देण्याचा सामुदायिक प्रतिसाद आहे. या चळवळीचे सदस्य स्वतःचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकारची वाट पहात नाहीत. तळागाळात काम करून ही चळवळ नव्या समाजाचे स्वप्न प्रत्यक्षात आणते आहे. या बद्दल अधिक वाचन करा. समविचारी लोकांचा गट तयार करा आणि स्वतःची चळवळ चालू करा. छोट्या छोट्या गोष्टीतूनच मोठी कामं होत असतात.

# संकीर्ण

**आपण आता या कृति आराखड्याच्या शेवटाकडे पोहोचतो आहोत. काही नव्या संकल्पना या ठिकाणी अशा साठी मांडल्या आहेत की त्यांमुळे साध्या जीवनाचा पाठपुरावा जास्त सहज आणि सातत्यानं करता येईल.**

- ध्यान आणि योगः मनाची शांतता मिळवण्यासाठी दिवसभरात १५ मिनिटं काढून शांत बसा. डोळे मिटा आणि श्वासाकडे लक्ष द्या. त्यामुळे ताण-तणाव नष्ट होतील.

- दैनंदिनी लिहा. उपयुक्त, आनंददायक आणि बोधक असा हा उपक्रम आहे. संध्याकाळी थोडा वेळ काढा. शांत बसून दिवसातल्या घडामोडींवर तुमच्या प्रतिक्रिया लिहा. तुमच्या मनःस्थितीचं वर्णन करा. घडलेली कोणती गोष्ट तुम्ही वेगळया पद्धतीनं केली असतीत ते नोंदवा. यामुळे पुढचं आयुष्य हेतुपूर्वक आणि लक्ष्यपूर्वक जगायला मदत होईल.

- साध्या जीवनशैली विषयक वाचन सतत चालू ठेवा. त्यामुळे उद्दिष्टापासून आपण विचलित होत नाही. इंटरनेटवर अशा प्रकारच्या विषयावर भरपूर मजकूर आहे. पण त्यातला मजकूर पारखून घ्यावा लागतो.

- दिवाळी, ख्रिसमस या सारखे सण फार बाजारशरण झाले आहेत. अशा सणांच्या वेळी हात राखून खर्च करा. परंपरांच्या फार आहारी जाऊ नका.

- आवश्यक तितका व्यायाम करा. त्यासाठी महागडी व्यायामशाळा लावण्याची गरज नाही. आठवड्यातून ३-४ वेळा धावण्याची सवय ठेवा. सूर्यनमस्कार आणि बागकाम हा उत्कृष्ट मोफत व्यायाम आहे.

- स्वच्छताकारक उत्पादनेः टी.व्ही. वरच्या जाहिराती पाहून आपली घरे किडे आणि जंतूंनी बुजबुजली आहेत असा आपला समज होऊ शकतो. पण हे खोटे आहे. ही छुपी धमकी देणारी जाहिरात असते. या कोणत्याही उत्पादनांपेक्षा खाण्याचा सोडा आणि व्हिनेगार यांचे मिश्रण उत्तम काम करते.

- मुलांचे संगोपनः तुमच्याकडे तुमची आणि आजूबाजूची मुले उदाहरण म्हणून पहात असतात. साध्या जीवनाच्या तत्वांनुसार आचरण असेल तर त्या मुलांवरही तेच संस्कार होणार आहेत. मालकी हक्क आणि प्रतिष्ठा यापेक्षा कितीतरी जास्त गोष्टी जीवनात महत्वाच्या आहेत.

- दान कराः मिळकतीचा काही भाग दान करा. तुम्ही जर हे पुस्तक वाचत असाल तर तुम्ही जगातल्या वरच्या दहा टक्क्यांतले असू शकाल. जशी आणि जेव्हा सवड होईल तेव्हा दान देत रहा.

- जीवनाचा वेग कमी करा. नवी सुंदर स्वप्नं पहा. व्यवस्थित रहा. स्वतःवर विश्वास ठेवा.

# कृतिशीलता

**साध्या जीवनशैलीच्या दिशेनं वाटचाल करताना आपल्यापैकी काहीजणांनी या जीवनशैलीच्या प्रचारासाठी वेळ आणि ऊर्जा दिली पाहिजे. आजच्या जगात आपल्यावर "अधिक उपभोग म्हणजेच आधिक चागंलं जीवन " या आशयाच्या संदेशांचा सतत वर्षाव केला जातो. अशावेळी या जीवनशैलीला चांगला पर्याय आहे हे अनेकांच्या नजरेला आलं पाहिजे. नव्या पर्यायाचा नवा संदेश पसरवण्यासाठी कदाचित तुम्ही मदत करू शकाल.**

- ही पुस्तिका तुमच्या संपर्कातल्या व्यक्तींना इ-मेल करा. ही कृती तुमच्यासाठी अगदी साधी असेल पण त्या कृतीचा परिणाम पाण्यावर उठणाऱ्या आणि एकमेकांना प्रेरित करणाऱ्या तरंगांसारखा आहे. चंगळवादी संस्कृतीच्या पाशातून अनेकांना मुक्त करण्यासाठी तुमची ही कृती कारणीभूत ठरू शकेल. साधी जीवनशैली जगण्यासाठी ज्या कृतींची व्यवहारात गरज आहे अशा अनेक कृती तुम्ही या पुस्तिकेत वाचल्या आहेत. कमी उपभोग घेऊन जीवनाचा अधिक अनुभव कसा घ्यायचा हे तुम्हाला ही पुस्तिका सांगते आहे.

- ही पुस्तिका स्थानिक शाळांमधे, नगरसेवकांकडे किंवा संसद सदस्यांपर्यंत पोहोचवा. याचा परिणाम फार मोठ्या प्रमाणावर होईल. छोटी मुलं साध्या जीवनशैली बद्दल लहानपणीच शिकताहेत अशी कल्पना करा. अशी कल्पना करा की संसदसदस्य साध्या जीवनशैली बद्दल चर्चा करताहेत. मग काहीच काळात हे जग बदलेल नाही का ?

- ही पुस्तिका, किंवा शाश्वत संस्कृती (Perma-culture), इंधनटंचाई या विषयांवरच्या पुस्तिका विकत घ्या. आणि आपल्या वर्गात, कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक जागेवर ठेवून द्या. तुम्ही जिथे नेहमी चहा पिता त्या ठिकाणी असं एखादं पुस्तक "विसरून" यायला तुम्हाला आवडेल. अनेक लोक उत्सुकतेनं ही पुस्तकं वाचतील. लोकशिक्षण करण्याचा हा एक अभिनव मार्ग म्हणावा लागेल.

- सामुदायिक परसबाग करण्यासाठी पावले उचला. अशी परसबाग अस्तित्वात असेल तर त्यात सामील व्हा. ही गोष्ट स्थानिक स्वराज्य संस्थेतही (नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत) घडवून आणता येईल.

- गनिमी काव्यानं बागकाम करा. दिसली जमीन की लावलंच झाड. मग ती जमीन कोणाची आहे, याचा फार विचार करू नका. टेकड्यांवर सामुदायिक रित्या झाडं लावणारे गट सध्या अस्तित्वात आहेतच. हे करताना बुद्धी गहाण मात्र टाकायची नाही. वाहतुक अडेल अशी, पुढे दिसायला अडथळा ठरतील अशा ठिकाणी झाडं लावायची नाहीयेत. आपली स्वतःची परसबाग फुलवून मग ही कृती करणं अधिक संयुक्तिक ठरेल. चंगळवादाच्या विरोधातलं हे एक शांततापूर्ण पाऊल आहे. असे उपक्रम चागंल्या भविष्यासाठी उपकारक ठरणार आहेत.

- साधी जीवनशैली प्रत्यक्षात आणणाऱ्या व्यक्तींचे एखादे मंडळ तयार करा. या जीवनशैली चा अभ्यास आणि तिच्या विविध अंगांवर चर्चा करा. नव्या कल्पना मांडा, ऐकून घ्या. यासाठी तुम्ही या विषयातले तज्ज्ञ असण्याची गरज नाही.

# राजकीय दृष्टिकोन

**व्यक्तिगत आणि सामुदायिक कृती यामुळे बदल घडतो. पण आपले निर्णय कायदेशीर, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेशी निगडित असतात. त्यामुळे जीवनशैली बाबतचे काही निर्णय सोपे तर काही अवघड ठरतात. आपण अशा समाजात रहातो जिथली समाज रचना चंगळवादी जीवनशैलीला उपकारक अशीच बनवलेली आहे. याच मुळे साध्या जीवनशैली बाबतचे निर्णय घेणं हे अवघड होऊन बसतं. या चंगळवादी रचना-व्यवस्थांपासून मुक्ती मिळवण्यासाठी सरकारचा पाठिंबा आपल्याला असला तर बरं होईल.**

- अन्न-धान्याचं स्थानिकीकरण. सामुदायिक परसबागेतून अन्न-धान्याचा मोठा भाग उत्पादित व्हावा यासाठी या अन्नावर सबसिडी मिळावी अशी मागणी करणं.
- अधिक आणि अधिक चांगले सायकल-मार्ग करण्यासाठी सरकारला भाग पाडणे.
- विविध उत्पादनांवर जास्त माहिती देणारी लेबले लावण्याची सक्ती करणारा नियम बनवणे. या माहितीत हे उत्पादन कुठे, कसे व कशापासून बनवले याची अधिक माहिती पुरवण्यात यायला हवी.
- कामाचे तास कमी करण्याचा नियम करणे. हॉलंड मधे असा नियम आहे. या नियमानुसार नोकर मालकाला किंवा व्यवस्थापकाला विनंती करून कामाचे तास कमी करून घेऊ शकतो. तो नोकराचा अधिकार आहे. क्वचित (आणि योग्य) प्रसंगी व्यावसायिक कारणामुळे ही विनंती मालक धुडकावू शकतो. हे प्रसंग एकुणात फक्त ५% आहेत. अर्धवेळ नोकरीच्या या नियमामुळे हॉलंडमधे अशा नोकरांचे प्रमाण जगात सर्वाधिक आहे.
- तेल इंधनाचं आपल्याला लागलेलं व्यसन मोडावं लागेल. कार्बन प्रदूषणाचा दर लक्षात घेऊन शाश्वत ऊर्जेच्या संशोधनाला गती द्यावी लागेल. तेल इंधनांवरचं अनुदान रद्द करावं लागेल.
- निसर्गाचं संरक्षण करण्यासाठी सरकारकडून कायदे करून घ्यावे लागतील.
- भली मोठी अर्थव्यवस्था हीच चांगली हा भ्रम मोडावा लागेल. निसर्गानं अर्थव्यवस्थेवर घातलेल्या मर्यादांचा विचार करून निर्णय घ्यावे लागतील. दरडोई उत्पन्न हा विकासाचा निकष न ठेवता, जीवनाची गुणवत्ता हा निकष महत्वाचा ठरायला हवा. GDP ऐवजी GPI (Genuine Progress Indicator) हे मानक असले पाहिजे.
- अर्थव्यवस्थेची अमर्याद वाढ होऊ न देता, गरिबीचं निवारण व्हायला हवं. त्यासाठी संपत्तीचं समान वाटप व्हावं लागेल. म्हणून प्रागतिक करनियम असतील आणि किमान मिळकतीची हमी द्यावी लागेल. साध्या जीवनशैलीत प्रत्येकाला त्याच्या गरजे प्रमाणे मिळेल आणि समाधानात जगता येईल.
- साध्या जीवनशैलीच्या अनुषंगाने विचार करून मत देणारे मतदार असतील तरच हे शक्य होईल.

# निष्कर्ष

या पुस्तकात वर्णन केलेला "साधे जीवन" हा मार्ग आजच्या काळातल्या अनेक संकटांशी मुकाबला करता येण्यासाठीचं तत्वज्ञान सांगतो. या अनेक संकटांमधे परिसरातल्या निसर्गाचा ऱ्हास, जगात पसरलेली गरिबी, अनर्थकारी वाढ, तीव्र इंधन टंचाई आणि चंगळवाद प्रामुख्यानं आहेत. जगातल्या नऊ अब्ज लोकांचं भवितव्य केवळ याच तत्वज्ञानाचा आधार घेतला तर चांगलं असेल. सगळे लोक भौतिक सुखाच्या इच्छेनं पछाडलेले असताना, पैसा कशासाठी आहे आणि अर्थव्यवस्था कशासाठी आहे हे प्रश्न विचारावेच लागतील. त्यांची उत्तरं शोधताना, आयुष्याचा अर्थ आणि समाधान हे भौतिक वस्तूंच्या उपभोगात सापडत नाही हे सत्य बाहेर येतं. आयुष्य हे मोठं महालासारखं घर, गालिचे, उंची कपडे, महागड्या गाड्या, चैन करण्याचे सुटीचे दिवस यातच घालवणं शहाणपणाचं नाही. त्या सर्वांपासून मुक्तता मिळवून अधिक आयुष्य, समाधान मिळवता येतं.

चंगळवादी संस्कृतीच्या ओझ्याखाली वाकलेले असतानाही, आपलं भवितव्य आखण्यासाठी आपल्याला स्वातंत्र्य नक्कीच आहे. त्यामुळे नव्या समाजरचना करत आपल्याला नव्या युगात पहिलं पदार्पण करता येईल. सगळ्या समाजालाच भौतिक सुखांच्या इच्छांनी जखडून टाकलेलं असताना, वेगळा विचार करणं अवघड मात्र आहेच. या संकटावर एकच-रामबाण असा उपाय नाहीच. मात्र त्या दिशेनं जाताना पहिलं पाऊल म्हणून व्यावहारिक कृतींचा एक आराखडा निर्माण होणं महत्वाचं आहे. या आराखड्यात अधिक चांगलं जगणं यावर विचार केंद्रित झाला आहे.

मात्र या पुस्तिकेतला प्रत्येक मुद्दा नव्या किचकट उपमुद्द्यांना जन्म देतो. अशा उपमुद्द्यांवर तुमच्या परिस्थितीनुसार विचार करून तुम्हाला उपाय काढायचे आहेत. साध्या जीवनाची तत्वं विषद करणाऱ्या या पुस्तिकेत, उत्तरांपेक्षा प्रश्न जास्त आहेत. याचा अर्थ असा की या प्रश्नांची उत्तरं व्यक्तींनी स्वतःच्या विवेक-बुद्धीनुसार शोधून आयुष्यात प्रत्यक्ष वापरायची आहेत. प्रत्येकजण एकमेवाद्वितीय आयुष्य जगत असतो. प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या निराळ्या, सामर्थ्य निराळं, परिस्थिती निराळी. ही तत्वं प्रत्यक्षात आणण्यासाठी छोटे छोटे निर्णय घ्या. त्यातल्या धाडसाची मजा लुटा आणि मग पुढच्या निर्णयांकडे वळा. थिओडोर रोसझॅक यांनी या स्थितीचं वर्णन अगदी बिनचूक केलं आहे:

***पुढे नेईल असा एक मार्ग आहे..कमी उपभोग घेणारी, उच्च दर्जाचं आयुष्य जगणारी हाडामांसाची माणसं लोकांच्या समोर उदाहरण म्हणून उभी करणं. अशी माणसं सध्या तुरळक प्रमाणात दिसताहेत. या प्रत्यक्ष उदाहरणांना संशोधन, वाद-संवाद हा पर्याय नाहीच. लोकांना हे दिसलं पाहिजे की परिसराचं कल्याण साधत, सामाजिक स्थितीचं भान राखतही साधं जगणं म्हणजे चांगलं जगणं. हा साधेपणा, जगण्यातला उत्साह, एकमेकांमधलं सहकार्य यामुळे आयुष्य सुंदर आणि मुक्त होईल...***

साधे जीवन जगण्यासाठी कृतीचा हा आराखडा तेव्हाच यशस्वी ठरेल जेव्हा या समाधानी आयुष्याबद्दल उत्सुकता वाढेल, काही धाडसी निर्णय घेतले जातील आणि वैविध्यपूर्ण प्रयत्नांनी साध्या जीवनाच्या मार्गावर आपण चालत राहू. त्यामुळेच या विलक्षण जीवनाचा दरवाजा सर्वांसाठी खुला राहील.

# "साधे जीवन" आणि भरभराट

## लेखक: टेड ट्रेनर

चंगळवादी समाजरचनेकडून शाश्वत, टिकाऊ समाजाकडे जाण्यासाठी, अति-उपभोग घेणाऱ्यांनी टोकाची साधी जीवनशैली अंगी बाणवली पाहिजे. याचा अर्थ त्यांनी विपन्नावस्थेत जगावं असं नाही. आपल्या मूळ गरजा बहुतेकवेळा अगदी साध्या आणि स्वस्त साधनांवरच भागवता येतात. या साधनांचा वापर करून आराम (चैन नव्हे), आरोग्य (खादाडपणा नव्हे) , सौंदर्य (बटबटीतपणा नव्हे) आणि कार्यक्षमता (आळस नव्हे) यांनी भरलेल्या आयुष्याकडे वाटचाल म्हणजे "साधे जीवन".

गरजा भागवण्यासाठी किमान साधनांचा उपोग करणं हा केवळ आपली पृथ्वी वाचवण्यासाठीचा त्याग आहे असं समजायचं काही कारण नाही. हे मार्ग आपलं आयुष्य समाधानी बनवण्यासाठी आहेत. अल्पखर्चाचं राहणीमान, वस्तूंचा पुनर्वापर, स्वतःचं अन्न स्वतःच उत्पादित करणं, विकत घेण्याऐवजी स्वतः बनवणं, निसर्गाकडे सोपवणं, दुरुस्त करणं, फळं टिकवणं, आपल्याकडच्या जादा वस्तू आणि जुन्या वस्तू इतरांना देणं-घेणं, वस्तू नीट वापरून टिकवणं, घरगुती अर्थव्यवस्था नियंत्रणात ठेवणं असे अनेक मार्ग त्यासाठी आवश्यक आहेत.

हा निबंध, साध्या जीवनात अल्पखर्चात कसं राहता येतं आणि किमान ऊर्जा वापरता येते या विषयी आहे. शाश्वत संस्कृती, स्वयंपूर्ण खेडी या बद्दलचे विचार आणि माझे संपूर्ण स्वावलंबनाचे अनुभव यावर हा निबंध आधारित आहे. हे एक सतत प्रगतिपथावर असणारं काम आहे. यातले आकडे सतत कमी व्हावेत असा माझा प्रयत्न असतो. पण आजच्या तुलनेत; खर्च, ऊर्जा आणि प्रदूषणांक किमान पातळीवर आणून जगता येतं हे मात्र नक्की. खर्च अतिशय कमी करणारे उपाय विचारात घेतले आहेत. पण त्यामुळे जीवनाची गुणवत्ता कमी होणार नाही याची मात्र काळजी घेतली आहे. हे विश्लेषण जसजसं तुमच्या समोर उलगडेल, तस-तसं ही अपेक्षित , चंगळवादा पासून दूर जाणारी, नवी समाजरचना तुमच्या डोळयासमोर उभी राहील.

## पार्श्वभूमी

१९७२ साली केलेलं "विकासाच्या मर्यादांचं विश्लेषण" असं सुचवतं की आत्ताच्या तुलनेत अत्यंत कमी दरडोई उत्पन्नात नीटपणे जगता येईल अशी जीवनपद्धत निर्माण झाली पाहिजे, म्हणजे प्रतिवर्ष शून्य टक्के विकासाच्या उद्दिष्टाकडे जाता येईल. वरील उद्दिष्ट साध्य होईल याची हमी "साधे जीवन" हा मार्ग देऊ शकतो. हे करताना जीवनाची गुणवत्ता उच्च राखता येईलच. मात्र त्यासाठी आत्ताच्या चंगळवादी रचनेपासून फार दूर जावं लागेल.

मी सुचवणार आहे ते उपाय अनेकांना स्वीकारार्ह वाटणार नाहीत. कदाचित इतक्या टोकाच्या उपायांची गरज येत्या काळात, चांगल्या भवितव्यासाठी जरुरीची नसेलही.

सध्याचं विश्लेषण असं सांगतं की आताच्या तुलनेत ५ ते १० टक्के दरडोई उत्पन्नात आणि आजच्या तुलनेत १५ टक्के ऊर्जेचा वापर करून जगता येईल. त्याच वेळी जीवनाची गुणवत्ता उच्च राखली जाईल आणि

जगातल्या अनेक अडचणींवर मात करता येईल.

सुचवलेली कपात सकृतदर्शनी ग्राह्य वाटणार नाही. पण केवळ उपभोग कमी करणं आणि व्यवस्थेची कार्यक्षमता वाढवणं या दोनच अंगांनी या विषयाकडे बघता येणार नाही. नवी ध्येयं, ती गाठण्यासाठीची नवी संसाधनं, आणि त्यासाठीची नवी व्यवस्था असा सर्वंकष विचारच योग्य ठरेल. विकास आणि चांगला समाज या दोन्हींची नवी व्याख्या करणं आता गरजेचं ठरेल. उदा. तिसऱ्या जगाच्या "विकासा" साठी, अधिक आर्थिक गुंतवणूक, अधिक वस्तूंची विक्री, अधिक वस्तूंची खरेदी आणि याच तिन्हीमधे सतत वाढ व्हावी यासाठी पुन्हा गुंतवणूक याच कल्पनांत आपण अडकून पडलो आहोत. याचं कारण असं आहे की या सगळयामागे अधिक दरडोई उत्पन्न आणि वाढणारं राहणीमान यालाच आपण चांगलं म्हटलं. उच्च राहणीमान हे सम्यक विकासाचं ध्येयच नाही. सम्यक् विकास या सर्व गोष्टी टाकाऊ ठरवतो. या विकासाची परिमाणंच वेगळी आहेत. स्वतःच्या मूलभूत अडचणी सोडवण्यासाठी, लोकांनी केलेला, ***सहकारी तत्वावर संसाधनांचा वापर*** हे एक परिमाण आहे. हे करताना ***जीवनाची गुणवत्ता वाढवणं*** हे दुसरं आणि हे करताना ***राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा भाग न होणं*** हे तिसरं परिमाण आहे.

हा वेगळा मार्ग चोखाळला की "साधे जीवन" स्वीकारलेला समुदाय अक्षरशः चमत्कार घडवेल. पर्वतप्राय कचरा, असुरक्षितता, कर्जबाजारीपणा, व्याज, काळजी, शोषण आणि (चंगळवादी संस्कृतीनं दिलेले) विविध अनुषंगिक अवांतर खर्च (जाहिरात, सल्लागार, बँक शुल्के, भाडे, वेष्टन खर्च वगैरे) टाळता येतील. चंगळवादी अर्थव्यवस्थेत कंपन्या काय करतात? तुम्ही त्यांच्याकडून अधिकाधिक रकमेची खरेदी करावी यासाठी तुम्हाला भाग पाडतात. तुम्हाला दिल्या जाणाऱ्या सेवांच्या संख्येत वाढ करत जातात. तुम्ही त्यांच्यावर अवलंबून राहिलात की मग दर वाढवतात. ज्या गोष्टी आपण स्वतःच स्वतःसाठी करत होतो त्या व्यापारी तत्वावर तुम्हाला देऊ करतात, आणि मुख्य म्हणजे तुमच्यासाठी नव्या गरजांचं उत्पादन करत राहतात.

या निबंधात प्रत्येक विभागाच्या शेवटी, दोन प्रौढ आणि दोन मुलं यांच्या कुटुंबाची गरज भागवण्यासाठी त्यांना येणारा खर्च आणि लागणारी ऊर्जा याचा अंदाज दिला आहे. त्या कुटुंबाच्या राहणीमानाचं वर्णनही केलं आहे. त्यानुसार सध्याच्या तुलनेत खर्च आणि ऊर्जा यात ९० टक्के कपात करता येईल असं आयुष्य शक्य आहे. हे अंदाज आहेत आणि त्यात बदल होऊ शकतील. अन्नापासून सुरुवात करून मग वस्त्र, निवारा, अवजारं, काम आणि ऊर्जा हे विषय मी हाताळणार आहे.

# अन्न

जवळजवळ सगळ्या अन्नाची गरज परसबाग, सामुदायिक भाजीबाग, शेजारी पाजारी, आणि जवळपास असलेली छोटी शेतं, या अगदी कमी अंतरावरच्या ठिकाणांकडून पुरी होईल. मोठ्या शहरांच्या दाट वस्तीच्या उपनगरांमधेही हे शक्य आहे. किमान खर्च आणि जवळजवळ शून्य ऊर्जा यासाठी लागेल.

## परसबाग

परसबागेतून येणारं उत्पादन कल्पनेपेक्षा खूपच जास्त असू शकतं. १९९९ साली ब्लेजी यांनी केलेले प्रयोग असं दाखवतात की सुमारे ४०० चौ. फूट क्षेत्रातून, जैविक पद्धतीनं परंपरागत जातींची दाट पिकं घेऊन, एक कुटुंब

पोसता येतं. हॅवाना इथल्या शहरी भागात कूंट यांच्या सर्वेक्षणानुसार, जैविक पद्धतीनं प्रति हेक्टरी (१ लाख चौरस फुटात) २१ टन उत्पादन इंधन, यंत्रं, रासायनिक खतं आणि कीटकनाशकं न वापरता २००९ साली घेता आलं.

हे उत्साहवर्धक उत्पादन मुख्यतः बागकामाच्या पद्धतीतल्या संशोधनामुळे शक्य होतं. पिकांच्या नव्या जाती, नव्या पद्धतीनं पण स्थानिक सल्लागार समित्यांच्या सल्ल्यानुसार वापरून पहायच्या. हे सल्लागार व्यावसायिक नसतात. या समित्यांच्या सल्ल्यामुळे ज्या जाती विकसित होतात, त्या विशिष्ट स्थानिक वातावरणात भरपूर उत्पादन देतात. त्या चवदार, कीड प्रतिरोधक, पोषक, कमी पाणी घेणाऱ्या आणि काढणी झाल्यानंतर भरपूर टिकणाऱ्या असतात. **आठवड्याला एकूण १० व्यक्ती-तासापेक्षा (man-hours) जास्त वेळ परसबागेसाठी द्यावा लागत नाही असा माझा स्वतःचा अनुभव आहे.** हा वेळ कामाचा म्हणून पाहिला जाऊ नये. तर ती मोकळ्या वेळात करण्याची सर्वोच्च प्राधान्य असणारी गोष्ट असली पाहिजे, विरंगुळा म्हणून पाहिली गेली पाहिजे. प्रत्येकानं माळी बनले पाहिजे असं नाही. प्रत्येक आठवड्याला दरडोई ३ तास बागकामासाठी दिले तर अन्नाचा प्रश्न मिटेल. हा वेळ आठवड्याच्या कामाच्या वेळाच्या केवळ १० टक्के आहे.

घरातल्या सगळया सांडपाण्याचा (संडास, न्हाणीघर आणि प्राण्यांच्या पिंजऱ्यातलं धरून) पुनर्वापर केला जाईल. त्यामुळे बाहेरून खत आणावं लागणार नाही. शिळया अन्नाचा भुगा कोंबड्या किंवा माशांना अन्न म्हणून उपयोगी पडेल. छोट्या हौदात, डबक्यांत माशांची पैदास केली जाईल. स्वयंपाकघरातले काही " टाकाऊ ” पदार्थ कोंबड्या किंवा सशांना मिळतील. कोंबडीखतानं समृद्ध झालेली जमीन नंतर बागेसाठी वापरली जाईल.

आपली वस्ती सामुदायिकरित्या संभाळलेल्या जागांनी भरून जाईल. बागा, भुईमूग, ऑलिव्ह, औषधी वनस्पती, बांबूची बेटं, लाकूडफाटा देणारी जंगलं, डबकी, बंधारे आणि हौद सार्वजनिक असतील. पूर्वी जिथे रस्ते, महामार्ग होते तिथे आता या साऱ्या गोष्टी उभ्या राहतील. समित्यांमार्फत त्यांचं व्यवस्थापन होईल, कार्यकर्त्यांचं मोहोळ श्रमदान करील. ज्या वेळी घरगुती बागांमधलं उत्पादन कुटुंबाच्या गरजेपेक्षा वाढेल त्यावेळी जादा उत्पादन सामुदायिक उत्पन्नात जमा होईल. प्रत्येक परसबागेत आणि कुटुंबासमोरच्या सामुदायिक जागेत मिळून किमान १५ प्रजातींची झाडं असतील जी त्या जमिनीत उत्तम वाढतील, आणि कुटुंबाला उपयुक्त असतील. गावरानात आणखी प्रजाती लावल्या जातील. आजूबाजूच्या छोट्या जंगलांमधून वाळलेला पाचोळा, इंधनासाठी लाकूड, वस्तू तयार करण्यासाठी लाकूड, मध, शेंगदाणे, फळं असा खजिना सगळ्यांना मिळेल.

सामुदायिक उपक्रम संस्था, कारागिरीसाठी लागणारी अवजारं आणि माल लोकांना पुरवतील. उदा. सुतारकामासाठी लाकूड, गवत, निलगिरी पानं, टोपल्या करंड्या बनवण्यासाठी काड्या आणि वेली, भांडी बनवण्यासाठी आणि बांधकामासाठी माती. जनावरं चारण्यासाठी कुरणं याच संस्था उपलब्ध करून देतील. मत्स्योत्पादनासाठी डबकी, अन्न प्रक्रिया करण्यासाठी आणि साठवणुकीसाठी शेड्स, नियंत्रित हवामानात भाज्या वाढवण्यासाठी हरितगृहं आणि मोठ्या प्राण्यांना हवामानाप्रमाणे नियंत्रित आसरा देणारे गोठे सामुदायिकच असतील. आपोआप येणाऱ्या रानभाज्या अनेक ठिकाणी जमिनींवर वाढतील.

## शेती

गावाच्या केंद्रस्थानापासून दोन कि.मि. च्या आत विविध छोटी शेतं असतील. परसबागेपेक्षा तिथे जास्त उत्पादन

होईल. त्यामुळे जादा उत्पादनाचं (भाजी, फळं, अंडी, लोणची, मुरांबे, सुकामेवा, लसूण, मध, औषधी वनस्पती) वाटप, विक्री, किंवा देवाण-घेवाण शेतकऱ्यांतर्फे केली जाईल. या वस्तू शेतातून स्वयंपाकघरात वेष्टनाशिवाय पोहोचत्या होतील. त्याआधी टिकवण्याची प्रक्रिया नसेल, विक्री प्रचार नसेल, वाहतुक-खर्च नसेल, कचरा नसेल आणि जाहिरात नसेल ! वाहतुक केलीच तर ती हातातल्या टोपल्यातून, सायकलीवरून किंवा टांगा बैलगाड्यांतून असेल. शेतातून थेट स्वयंपाकघरात पदार्थ जात असल्यामुळे घरोघरी फ्रिज ठेवण्याची गरजच असणार नाही. गरजेच्या वेळी असावे म्हणून सामुदायिक फ्रिज ठेवता येतील. खूप मोठी शेतं संख्येनं अगदीच कमी असतील. जी असतील तिथे ट्रॅक्टर सारखी यंत्रं सामुदायिक रित्या वापरली जातील. गावातून फारशा वस्तू निर्यात होणार नाहीत. आयातीची गरजही पडणार नाही.

तृणधान्य मोठ्या प्रमाणात गावात आयात करावं लागण्याची शक्यता आहे. एका व्यक्तीला दर आठवड्याला (१ किलो पिठापासून बनवलेले) २ मोठे पाव लागतात असं गृहीत धरलं तर एका माणसामागे ९०० चौ. फूट जमीन धान्यासाठी लागेल. १ लाक चौरस फूट जमिनीतून प्रतिवर्षी ६ टन धान्योत्पादन होतं असं समजता येतं. मात्र अगदी लहान प्रमाणात धान्य परसबागेतही पिकवता येईल.

शाश्वत संस्कृतीच्या (sustainable culture) तत्वानुसार, बारमाही-बहुवर्षीय भाजी प्रजाती (उदा. तोंडली, अळू, वांगी इत्यादी) आणि फळझाडं जोपासली तर, नांगरणी कमितकमी लागेल. घोडे, बैल हे वाहतूक आणि शेतीची इतर कामं यासाठी वापरले जातील.

पेय-निर्मिती स्थानिक पातळीवरच होईल. त्यात फळांचे रस, वाइन, बीर, चहा आणि कॉफीचे पर्याय असतील. साखरेऐवजी मध बहुतेक ठिकाणी वापरला जाईल. त्यामुळे साखरेसाठीची वाहतूक टळेल आणि जमिनीचा ऱ्हासही. शिवाय मधाच्या अधिक उत्पादनामुळे परागीभवन अधिक कार्यक्षम होईल. हौशी मधमाशापालक आपल्या सर्व गरजा भागवू शकतील इतक्या प्रमाणावर मधाची गरज भासेल.

मांसाची मागणी किमान पातळीवर जाईल. त्यामुळे एकूणच धान्याचीही गरज कमी होईल. (अमेरिकेत एकूण धान्यापैकी ६७% धान्य मांसासाठी वाढवलेल्या पशूंना देण्यासाठी वापरलं जातं.) मांसाहाराची गरज कोंबडीपालन, मासेपालन आणि ससेपालन यापासून भागवली जाईल. कोंबडीपालनाचा मुख्य हेतू बागेसाठी खत देणं हा असेल.

मोसमानुसारच पिकाचं उत्पादन होईल त्यामुळे खाणंही मोसमानुसारच असेल. यामुळे बाहेरून आणायच्या अन्नाचा वाहतूक-खर्च वाचेल. फक्त स्थानिक वातावरणाला योग्य अशाच प्रजातींचं उत्पादन होईल. नव्या मोसमात येणाऱ्या अन्नोत्पादनांची लोक त्यामुळे आतुरतेनं वाट पहातील.

व्यवस्थापन समिती जगभरातल्या अनेक प्रजातींचा अभ्यास करत राहील. या पैकी ज्या स्थानिक वातावरणाशी जुळवून घेतील, त्यांची पैदास केली जाईल. ही समिती स्थानिक धान्य-भाज्यांपासून विविध पदार्थ तयार करण्यावर भर देईल. या पासून स्वस्त आणि पोषक जेवण कसं बनेल यावरही संशोधन केलं जाईल. विविध रानभाज्यांचा यात समावेश असेल. जगात अशा अनेक वनस्पती आहेत ज्या आपल्या स्थानिक वातावरणात उगवायला योग्य आहेत. पण त्यांचा आपण विचारच केलेला नाही.

जैविक कचरा मातीकडे परत जाईल तो कचरा-पाचका (bio-garbage-digester) मार्फत, मिथेन वायू तयार

केल्यानंतरच. अगदी लहान जंगलं (किमान वाहतुकीला लागणारं) इथेनॉल तयार करण्यासाठी राखीव असतील. ॲल्युमिनियम, लोखंड किंवा प्लॅस्टिक ऐवजी शक्यतो सर्वत्र लाकडाचा वापर केला जाईल. उदा. अवजारांच्या मुठी, टेबल खुर्च्या, बैठक व्यवस्था, पलंग, बांधकाम, मालवाहतुकीचे डबे, होड्या इत्यादी. अन्न बनवताना विद्युत-यंत्रांऐवजी हाताने वापरण्याची यंत्रं वापरली जातील.

जमिनीचे आच्छादन, मोठ्या झाडांची पिकं, ठिबक सिंचन आणि पिकांच्या खास निवडलेल्या प्रजाति यामुळे पाण्याचा वापर कमितकमी असेल. सांडपाणी, प्राण्यांची विष्ठा, अशा गोष्टी कंपोस्ट ढिगात, स्वयंपाकघरातला ओला कचरा, कचरा पाचकात (मिथेन डायजेस्टर) किंवा मत्स्यपालनाच्या हौदात (मत्स्य खाद्य म्हणून) जाईल.

हौदातले मत्स्यपालन हे त्याजोडीनं केलेल्या बदकपालन आणि उपयुक्त जलवनस्पतींच्या पैदाशीमुळे परवडेल. बांबूची छोटी बेटं ठिकठिकाणी असतील.

वनस्पतीजन्य पदार्थ औद्योगिक आणि कला-कौशल्या साठीही उपयुक्त असतील. धाग्यांवर रासायनिक प्रक्रिया करण्यासाठी, प्लॅस्टिक साठी वापरण्यात येणाऱ्या पेट्रोलियम उपउत्पादनांऐवजी, उद्योगांसाठी लागणारी विविध तेले, रंग आणि मेण ही काही उदाहरणं आहेत. विविध झुडुपांचे औषधी उपयोगही केले जातील. उदा. मलमांसाठी कोरफड, चहाच्या झाडाचं तेल अँटिसेप्टिक म्हणून, चीज, ऑलिव्ह तेल, रंग आणि साबण या वस्तू स्थानिक वनस्पतींपासून लहान प्रमाणात सहज बनवता येतील. या वस्तू स्थानिक छोट्या खाजगी उद्योगांमधून किंवा सहकारी उद्योगांमधून येतील. त्यामुळे अनेकांना काम मिळेल. उत्पादनांची विक्री विक्रेत्यांशिवाय होईल. उदा. रस्त्यांच्या कडेला दाणे ठेवलेले असतील आणि ज्याला पाहिजेत तो ते घेईल, पैसे ठेवील आणि पुढे जाईल. समाजात एकमेकांबद्दल पूर्ण विश्वास असेल.

अनेक दुकानं आठवड्यात फक्त एक किंवा दोन दिवस उघडी असतील. उदा. तुम्हाला नवी पादत्राणं घ्यायची असतील तर मंगळवारी मिळतील, वेळ आणि श्रम वाचतील. कृत्रिम कीटकनाशकांची गरज नसेल. पण पायरेथ्रम, कडुलिंब किंवा तंबाखू या स्थानिक झाडांपासून नैसर्गिक कीटकनाशकं तयार करता येतील. शाश्वत संस्कृतीत एकाच प्रकारची पिकं एका जमिनीत घेतली जात नाहीत. त्यामुळे मुळातच कीड लागण्याचं प्रमाण कमी असेल.

साठवण, शीतलीकरण आणि वेष्टन या तीनही गोष्टी अगदी कमी प्रमाणात लागतील कारण परसबागेतून स्वयंपाकघरात अन्नसाहित्य थेट आणता येतील. मुळा, बटाटा यासारख्या गोष्टी स्वयंपाकासाठी नको असतील तोवर बागेत जमिनीखालीच (न तोडता) ठेवता येतील. फळं जेव्हा हवी तेव्हा झाडांवरून घेता येतील, गरजेची नसलेली फळं झाडांवरच पिकतील. अल्पप्रमाणात असलेली शीतगृहं आणि साठवणगृहं मोसमानंतर काही दिवस पदार्थ वाळवून, टिकवून, गार करून साठवतील.

या साऱ्या गोष्टींकरता किमान ऊर्जेचा वापर होईल. छोटे शेतकरी आणि परसबाग पिकवणारे ऊर्जेच्या बाबतीत सध्याच्या शेती-उद्यागाच्या तुलनेत अतिशय कार्यक्षम ठरतात. या मुळे सध्याचा अमेरिकेतला १७ टक्के ऊर्जा खर्च वाचेल, कारण तो शेतीसाठी केला जातो. नांगरणी, कृत्रिम खतं, कीटकनाशकं, यंत्रं, व्यावसायिक प्रक्रिया, वेष्टनीकरण, शीतलीकरण, विपणन (मार्केटिंग), वाहतूक, कचरा उचलणं आणि त्याचं निराकरण या पैकी काहीही शाश्वत शेतीत नसेल. दुकानं आणि घरासाठी लागणारे पदार्थ अगदी जवळपास मिळतील. अन्नपदार्थांना

जास्तित जास्त २०० मिटर प्रवास घडेल. (आज अमेरिकेत हा प्रवास २,०००,००० मिटर आहे.) आपल्याला ट्रक्स, ट्रॅक्टर्स, शेतीची यंत्रं, जहाजं, सुपरबाजार, जाहिरातबाजी, शीतगृहं, प्लास्टिक पिशव्या, घरगुती फ्रिजेस आणि कचरा व्यवस्थापन यांची गरजच भासणार नाही. या सर्वांवर होणारा खर्च वाचेल. सगळा ओला कचरा जमिनीकडे परत जाईल. परसबाग आणि प्राणीघर यांपासून थेट स्वयंपाकघरात अन्न पदार्थ जातील. स्वयंपाकघरातून थेट परसबागेत आणि प्राणीघरात ओला कचरा जाईल. त्यासाठी वेगळ्या वाहतुकीची आणि गटारी पाइपांची गरज नाही. जादा अन्न पदार्थ स्थानिकरित्या बनवलेल्या काचेच्या किंवा चिनीमातीच्या भांड्यात साठवलं जाईल (टिन कॅन मधे नाही). थोडी खराब झालेली (पण खायला योग्य) फळं, भाज्या वापरात येतील, वाया जाणार नाहीत. कारण आज त्या सुपरमार्केट्स कडून नाकारल्या जातात.

अर्थात, ज्यांना बागकामाची आवड नाही त्यांनी तेच काम केलं पाहिजे अशी सक्ती नाही. इतरांनी केलेलं उत्पादन ते विकत घेतील आणि आपल्या स्वतःच्या क्षेत्रात काम करतील. परसबागेतली जादा उत्पादनं मुख्यतः दिली घेतली जातील (barter) किंवा समाजगृहात उचलून नेण्यासाठी ठेवली जातील. समित्या अशा गोष्टींची नोंद करतील अभ्यास करून एकूण काय आणि किती उत्पादन केले पाहिजे याचा अंदाज घेतील. लोक आपापल्या परसबागेत, नेहमी नव्या प्रजातींवर प्रयोग करत राहतील.

अशा तऱ्हेच्या समाजात स्थानिक अर्थव्यवस्था यशस्वी होण्यासाठी, कौशल्यांची देवाणघेवाण, एकमेकांना मदत, शिक्षण आणि संशोधन यासाठी भरपूर वेळ दिला जाईल. आपल्या परसबागेतून उत्पन्न काढून जगायची धडपड कुटुंबाला एकटेपणाने करावी लागणार नाही. सर्वांच्या बागांत भरपूर उत्पादन व्हावे यात प्रत्येकाला रस असेल.

नवे शोध आणि चांगल्या कल्पना यांची एकमेकांत देवाणघेवाण होईल. पूर्ण अन्नोत्पादन व्यवस्था कार्यक्षम असेल. परसबागांप्रमाणेच सामुदायिक बागांमधे काम करणं हेही आनंददायक असेल.

या साऱ्याचा परिणाम केवळ अर्थव्यवस्थेवरच होईल असं नव्हे तर आरोग्य, सामाजिक संबंध, मोकळा वेळ आणि शिक्षण या सगळ्यांतच उत्क्रांती होईल. बागकामामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढेल आणि मोकळा वेळ चांगला जाईल, शिवाय प्रदर्शनं, व्याख्यानं आणि संशोधनपर उपक्रम यांमुळे शिक्षण, करमणूक आणि सामाजिक बांधिलकी वाढेल.

भरपूर, उच्च गुणवत्तेचं अन्न आणि इतर माल, सुंदर हिरवेगार भूभाग, समाधानकारक मिळकत आणि आनंददायक मोकळा वेळ मिळेल. त्यासाठी वेगळी ऊर्जा, संसाधनं वापरावी लागणार नाहीत आणि प्रदूषणही होणार नाही. शिवाय हे सगळं सूट-बूट न घालता होईल ! अन्न-पुरवठा कंपन्यांमधले बहुतेक लोक आज नवे कपडे घालून संगणकासमोर बसलेले असतात. त्यांना कंपनी लॉ, हिशेब, वाहतुक-व्यवस्थापन आणि अर्थपुरवठा क्षेत्रातल्या पदव्यांची गरज भासते. अशी कोणतीच गोष्ट शाश्वत संस्कृतीत आवश्यक नाही. अशा लोकांना मातीत हात घालून काम करण्यात अजिबात रस नसतो. आणि ज्या लोकांना तो असतो त्यांना ते या व्यवसायातून बाहेर हाकलतात.

### माझं घरगुती अंदाजपत्रक

स्वतःची परसबाग, शेजाऱ्यांशी देवाणघेवाण, सामुदायिक बागांमधील "मोफत" अन्न, यांमुळे भाज्या, फळं, कडधान्य, कोंबडी आणि मासे शून्य खर्चात उपलब्ध होतील. स्थानिक छोट्या शेतांकडून उरलेलं १५% अन्न

विकत घ्यावं लागेल. उदा. दुग्धजन्य पदार्थ, धान्य-पीठ, सोयाबीन, चीज, फळांचे रस.
याची ऑस्ट्रेलियन-डॉलर मधली किंमतः **प्रत्येक आठवड्याला ३० डॉलर, प्रतिव्यक्ती प्रतिवर्षी १५०० डॉलर**

**ऊर्जेचं साप्ताहिक अंदाजपत्रक:**

परसबाग आणि सामुदायिक बागेसाठी (पंप ऊर्जा वगळता) कोणताही ऊर्जा खर्च नाही. १२ व्होल्ट्सचा पंप पाणी टाकीत चढवण्यासाठी. मात्र लपलेल्या ऊर्जा अनेक आहेत. उदा. अवजारं, तारांची जाळी बनवणे, टोपल्या तयार करणे, साठवणुकीच्या गोष्टी तयार करणे, मातीचे बंधारे बांधणे, मत्स्यपालनासाठी डबकी बनवणे, टाक्या तयार करणे, नळ आणि जलवाहिन्या बनवणे. १२ व्होल्ट्सचा पंप साधारणपणे २० ते २५ वर्ष टिकणे अपेक्षित आहे.

सामुदायिक छोटी शेतं छोटे ट्रॅक्टर्स, विजेचे मोटार पंप, कुंपण, बंधारे, कच्चे निवारे, विविध प्रक्रियांची साधी यंत्रं अशा गोष्टी वापरतील. या सहकारी संस्थेचे समभाग प्रत्येकानं घ्यायचे आहेत. खतं, कीटकनाशकं आणि वाहतूक यांचा खर्च शून्य. पाणी देणारे पंप, ट्रॅक्टर आणि प्रक्रिया यंत्रं चालवण्यासाठी सततचा ऊर्जा खर्च आहे.

# इमारती

घरं, कच्चे निवारे, लघुउद्योगांसाठी इमारती, समाजगृहं यांसाठी इमारती लागतील. या सर्व नव्याने बांधायच्या इमारती असतील तर (जुन्या इमारती वापरायला प्राधान्य), स्थानिक माती, दगड, गवताचे भारे, वापरून बांधलेल्या असतील त्या शेकडो वर्ष टिकण्यासाठीच. घरात फरशीऐवजी माती धोपटून त्यावर मेण आणि टर्पेंटाइनचा थर दिलेला असेल. छत लाकडी वाशांवर मातीची कौलं टाकून, किंवा मातीच्या विटांचे घुमट बांधून केले जाईल. त्यावर सिमेंटचा/मळलेल्या चुन्याचा पातळ थर असेल. भिंतीचे रंग आणि छतांची गळती थांबवणं या सामग्रीसाठी संशोधन चालू राहील. ही सामग्री वनस्पती वा प्राणिजन्य पदार्थांपासून बनेल. उदा. घराच्या भिंतीना रंग द्यायला आणि गळती बुजवायला चुना आणि दूध यांचे प्रमाणबद्ध मिश्रण वापरता येईल.

लोकांना घरं बांधण्यासाठी, लाकूड-चुलीवर अन्न शिजवण्यासाठी वेळ असेल. शाकाहारावर जोर असल्यामुळे हा वेळ कमी होईल. गालिच्यांऐवजी लोकरी रग वापरले जातील. त्यामुळे व्हॅक्युम-क्लिनर्सची गरज रहाणार नाही (रग्ज बाहेर न्या, झटका, जमीन झाडून, पुसून घ्या). चटया, बैठकी या स्थानिक जाड गवतापासून विणलेल्या असतील.

**माझ्या स्वप्नातलं घर**

मला पुढे वर्णन केलेल्या घरात रहायला आवडेल. हे वर्णन फार लोकांना पटेल, रुचेल असं नाही. पण जगातले सगळे, १० अब्ज लोक, कशा घरात राहू शकतील याचा विचार करा. एखादं जोडपं किंवा ४ जणांच्या कुटुंबाला या वर्णन केलेल्या घरापेक्षा दीडपट मोठ्या घरात सहज रहाता येईल.
मी काही नेहमी घरात असतो असं नाही. बराच काळ मी आजूबाजूलाच असतो. परसबागेत, कर्मशाळेत, प्राण्यांच्या खुराड्यांत आणि घराच्या बाहेरही असतो. त्यामुळे घराच्या आत मला फार जागा नको असते.
माझं स्वप्नातलं घर लहानसं असेल. त्यामुळे उजेडाचा आणि उबेचा खर्च कमी होईल. घर स्वच्छतेचा वेळ वाचेल. बाहेरची खोली १० x २४ फुटाची असेल. २०० चौ. फुटांचा शयनकक्ष असेल, ५० चौरस फुटात

बाथरूम आणि संडास मावेल. घराची उंची सात-सव्वासात फूट असेल. लाकूड इंधन म्हणून वापरलेली चूल स्वयंपाकासाठी आणि घर गरम ठेवण्यासाठी. नळीच्या पत्र्याचं छप्पर सुरुवातीला ठीक असेल. पण पुढे जमेल तेव्हा हातानं बनवलेल्या कौलांनी छप्पर बनेल. फ्रिज नको. पाणी वापरून आणि माठाच्या तत्वावर गारवा मिळवला जाईल.

सतरंजी गालिचे नाहीत. कार्यशाळा, साठवणगृह आणि कपडे धुण्याची जागा बाहेरच्या कच्च्या निवाऱ्यात असेल. माळयावर जाण्यासाठी लहानसा जिना किंवा शिडी. थंडीत ऊन्हं खाण्यासाठी पडवी. पाणी साठवण्यासाठी सिमेंट आणि चिकनमेश वापरून तयार केलेल्या दंडगोलाकार टाक्या. रात्रीच्या उजेड आणि उन्हाळयात (पंख्याच्या) वाऱ्यासाठी सोलर पॅनेल आणि बॅटरी.

भिंती २७ सें.मि. जाड (सुमारे १ फूट). त्यामुळे १३ घनमिटर माती जमिनीतून काढावी लागेल. भिंतीसाठीचे साचे उसने आणलेले. जिथून माती खणली तो खड्डा नंतर माशांसाठीचे डबके होईल.

अशा घरासाठीची २०१० साली काढलेली ऑस्ट्रेलियन डॉलर मधे किंमतः ५५०० डॉलर. यात मजुरी धरलेली नाही (हे अंदाजपत्रक टेड ट्रेनर यांनी त्यांच्या The transition into a sustainable and just world या निबंधात मांडले आहे). चंगळवादी संस्कृतीत या पेक्षा (साधारण साडेचार पट) मोठं घर ऑस्ट्रेलियात दीड लाख डॉलरला बांधलं जातं. पण बँकेचं व्याज धरून त्याची किंमत सुमारे चार लाख डॉलर होते.

जुन्या बांधकाम साहित्याचा पुनर्वापर घरासाठी केला तर त्याची किंमत ५५०० हूनही कमी होते. मजुरी ० डॉलर. कारण स्वतःच हातानं वापरण्याच्या अवजारांनी बांधलेलं हे घर असेल. मित्रांनी ते बांधताना हातभार लावला असेल. अनुभवी बिल्डरचं मार्गदर्शन घेतलं जाईल. त्यांचं हे "कर्ज" नंतर मित्रांच्या कामात हातभार लावून परत फेडलं जाईल. सावकाश बांधकाम करायचं. घरावर छत घातलं की राहायला जायचं आणि आतल्या गोष्टी नंतर स्वतःच बसवायच्या या पद्धतीनं घरबांधणी होईल.

स्थानिक दुकानं, व्यावसायिक कार्यालयं, ग्रंथालयं, समाजगृहं अशा वास्तु वर सांगितलेल्या पद्धतीनंच बांधल्या जातील. त्या लहान असतील, जास्तित जास्त तीन मजली असतील, त्यामुळे लिफ्टची गरज भासणार नाही. माती, गवत आणि स्थानिक लाकूड यांचा वापर बांधकामासाठी केला जाईल. त्या चकाचक नसतील. धातु आणि प्लास्टिकचा किमान वापर केला जाईल. त्याचा अर्थ या इमारती कुरुप दिसतील असा नाही. वेगळया तऱ्हेनं, नैसर्गिक मोफत साहित्याचा कलात्मक वापर करून त्या सजवण्यात येतील.

समाजगृहं आणि त्यांची रचना प्रेरणादायी असेल. ती लोकांनी स्वतःच्या हातांनी, स्वतःच्या जंगलातलं साहित्य वापरून बांधलेली, कल्पनाशक्ती आणि सहकार्याचा साक्षात्कार घडवणारी देवालयंच असतील. असे प्रकल्प फारच मौल्यवान असतील त्यामुळे एखाद्या ठेकेदाराला देणं शहाणपणाचं ठरणार नाही !

**इतर गोष्टी:**

गटारं, पाण्याचे लोखंडी-प्लास्टिकचे पाइप्स, नळ, बेसिन, संडासाचं भांडं, टेबल, खुर्च्या, विजेच्या तारा, स्विचेस, घराच्या कड्या, १२ व्होल्ट्स चे पंप, छतावर ठेवण्याच्या टाक्या वगैरे.

**डॉलर-खर्च:** हे घर १०० वर्ष टिकेल असं बांधलं जाईल. त्यामुळे घरात राहणाऱ्या चार लोकांचा विचार करता, दरडोई खर्च प्रतिवर्षी साडे-सत्तावीस डॉलर येतो. आता सध्याच्या परिस्थितीत बहुतेक लोक आपल्या मिळकतीचा तिसरा हिस्सा घराच्या कर्जफेडीसाठी किंवा भाड्यासाठी देत असतात याचा विचार करा.

माझ्या घराच्या एकूण किंमतीच्या (११००० डॉलर) तुलनेत दीडलाख डॉलरचं घर (साडेचार पट मोठं असलं तरी) व्याजदर आणि कर यांचा विचार करता, साधारण १३ पट महाग पडतं.

**ऊर्जा:**

**लाकूडः** जमिनीसाठी लाकूडः २० चौ.मि. x २.५ सें.मि. जाड. = अर्धा घन मिटर

छतासाठी लाकूडः ८० मि. ५० मि.मि. ६५ मि.मि. = ०.३ घन मिटर

एकूण लाकूडः ०.८ घनमिटर

१ घन मिटर लाकूड-वजन १ टन असं गृहीत धरून, १ टन लाकडात अंतर्भूत ऊर्जा १८ गिगा जूल प्रतिटन

म्हणून घरासाठीची ०.८ घनमिटर लाकडाची ऊर्जा १४.४ गिगा जूल.
छतासाठी वापलेल्या टिनची अंगभूत ऊर्जा: ५० चौ.मि. टिन
= १६० कि.ग्रॅ. x ४४ मेगा जूल प्रति कि.ग्रॅ. = ७.१ गिगा जूल
**काच:** काचेसाठीची अंगभूत ऊर्जा: १८ चौ.मि. x २०० मेगा जूल प्रति चौ. मिटर = ३.६ गिगा जूल
**सिमेंट:** पायासाठी सिमेंटचा वापर नाही. जुन्या इमारतीतले मोडलेले कॉंक्रिटचे तुकडे पायात घालून त्यावर मातीचं हलकं घर बांधलं जाईल.
पाण्याच्या टाकीत वापरलेलं सिमेंट (फेरोक्रिट पद्धत) ६ घन मिटर कॉंक्रीट + री एनफोर्समेंट रॉड्स आणि चिकन वायर यांच्या साठीची ऊर्जा = २.१ गिगा जूल.
या सर्व ऊर्जांची बेरीज २७.२ गिगा जूल होते. त्याखेरीज तितकीच अधिक ऊर्जा लागेल असं गृहीत धरून एकूण ५० गिगा जूल ऊर्जा घरासाठी खर्च होईल. चार जणांच्या कुटुंबाला दरडोई ऊर्जा १२५ मेगा जूल प्रतिवर्षी. सध्याच्या विजेच्या दरा प्रमाणे हा दरडोई ऊर्जाखर्च प्रतिवर्षी प्रतिडोई **फक्त ४.५ डॉलर** इतका येतो.

# अवजारं आणि यंत्रणा

मला लाकडी बैठक-शयन-व्यवस्था (furniture), घरबांधणी, कपडे बनवणे-दुरुस्त करणे, अन्न पदार्थ बनवणं या साऱ्यांसाठी हातानं वापरण्याची अवजारं आवडतात. पण काही अवजारं विद्युत-यांत्रिक असण्यात सोय असते (माझी कर्मशाळा १२ व्होल्ट्सच्या सोलर पॅनेल विजेवर चालते). काही स्थानिक व्यवसाय आणि छोटी शेतं यांना छोटी इंजिनं, विद्युत मोटारी, यांत्रिक करवतींसारख्या यंत्रणा आवश्यक असतात. स्थानिक कारखाने साधे, दणकट , टिकाऊ, दुरुस्त करण्यासारखे स्टोव्हज्, फ्रिजेस्, रेडिओ, हीटर्स, टाक्या आणि लाकडी बैठक-व्यवस्था बनवतील. पण यातल्या बऱ्याचशा वस्तू घरगुती बनावटीच्या असतील. कपबशा, भांडी, कढया, झाडू (व्हॅक्युम क्लिनर नको) बागकामाची अवजारं कौलं, कपडे आणि इमारती लाकूड यांच्या निर्मितीसाठी ही अवजारं लागतील.

देशाच्या पोलाद उद्योगाकडून अवजड वासे, पाइप्स, ओतीव भाग असं काहीही घेतलं जाणार नाही. कारण त्यांची गरजच नसेल. त्याऐवजी पोलादी पट्ट्या, रॉड्स, नळया, अँगल्स, जी. आय. वायर आणि जाळ्या, खिळे, नट, बोल्ट्स् इतकंच साहित्य मागितलं जाईल.

लेथ, प्रेस यासारखी मोठी यंत्रं, सामुदायिक कर्मशाळा आणि छोट्या कारखान्यांना उपलब्ध होतील.

अशा रीतीनं, यांत्रिक उत्पादनं आणि बांधकाम यांचं प्रमाण अगदी कमी असेल. त्यामुळे अवजड मशीनरीची गरज राहणार नाही. गगनचुंबी इमारती, प्रचंड पूल, बोगदे, विमानं आणि विमानतळं, ट्रक्स, चारचाक्या, जहाजं, क्रेन्स आणि बुलडोझर ही आपली गरजच नसेल. गावं स्वयंपूर्ण असल्यामुळे मालवाहतुकीची गरज फार नसेल. मोकळ्या वेळात फार दूर जायची गरज राहणार नाही. काही बसेस, राष्ट्रीय रेल्वे व्यवस्था आणि खूपशा सायकली (शिवाय टांगे आणि बैलगाड्या) ही आपली गरज असेल. ही अर्थव्यवस्था स्थिर असल्यामुळे बांधकाम फक्त असलेल्या इमारती वापरल्यावर करावं लागेल, नव्या पवनचक्क्या उभाराव्या लागतील, छोटे रस्ते बांधले जातील.

**अवजारांसाठी आणि डागडुजीसाठी घरगुती अंदाजपत्रक**

डॉलर मधील किंमत: अवजारांसाठी लागणारं लाकूड (उदा. मुठी बनवायला) गोल फांद्यांपासून मिळेल. छोट्या

यांत्रिक करवतींनी कापलं जाईल. नवं बांधकाम जिथे होत नाही तिथे केवळ देखभाली साठी लागणारी अवजारं हातांनी वापरण्याचीच असतील. त्यामुळे त्यांचा खर्च फार नसेल. एकदाच करावा लागेल. कारण बहुतेक अवजारं कारागिराच्या हयातभर टिकतात. लोखंड, काच, सिमेंट यांचा प्रतिवर्षी खर्च कमाल २०० ते ५०० डॉलर असेल. यात आग लागणे किंवा वादळ यामुळे होणारं नुकसान व डागडुजी अंतर्भूत नाही.

ऊर्जा खर्चः तोंड धुण्याचं भांडं, संडासाचं भांडं, शॉवर्स (बाथ टब नसतील), धुण्याभांड्यासाठी टब, स्टोव्ह, छोटा फ्रिज यासारख्या गोष्टी किमान ५० वर्ष टिकण्यासाठी, दुरुस्ती करण्यायोग्य, बनवल्या जातील. कला, कौशल्य कारागिरीसाठी ऊर्जाः ०.३ गिगा जूल प्रतिवर्षी प्रतिव्यक्ती.

# कपडे

साधे, दणकट, स्वस्त आणि टिकाऊ हवेत. अनेकदा गरज पडली की जुनेच वापरले जातील आणि वारंवार दुरुस्त केले जातील. कोणालाही सूट किंवा टाय ची गरज भासणार नाही. माझा एक छंद स्वतःचे कपडे दुरुस्त करणं आणि रफू करणं हा आहे. (माझा एक सदरा ३५ वर्ष टिकला. एकदा चुकून तो झुडुपात राहिला आणि झुडुपाला आग लागली.) काही खास कार्यक्रमांसाठी आमच्याकडे खास कपडे असतील पण ते महाग नसतील. माझ्याकडे एक "चांगल्या" बुटांची जोडी आहे. टाय मी वापरत नाही आणि गेल्या चार दशकांत सूट कधीही घातलेला नाही. ज्या कुणाला याच्या पेक्षा जास्त "चांगल्या" कपड्यांची गरज भासेल त्यांनी ते घ्यावेत पण आपल्याला फॅशनच्या आपल्या कल्पना मात्र आमूलाग्र बदलाव्या लागतील. काही लोक नवे कपडे शिवण्याचा छोटासा व्यवसाय करू शकतील.

जुने आणि झिजलेले कपडे पुन्हा पुन्हा वापरले जातील. गरजूंना देऊन टाकले जातील किंवा सेकंड हँड कपड्यांच्या दुकानातून पुन्हा वितरित होतील. शिंपीकाम आणि कपडे दुरुस्ती हे छंद म्हणून जोपासले जातील. काही छोटे उद्योग, कपड्यांसाठी लागणाऱ्या छोट्या गोष्टी मोठ्या प्रमाणात बनवतील (उदा. बटणं) हीच गोष्ट चप्पल बुटांची. कारखाने, छोट्या उद्योगांना साध्या कापडाचे तागे, चप्पल-सँडल्स किंवा स्लिपर्सना लागणारे भाग पुरवतील. चप्पल-सँडल्स-स्लिपर्सची दुरुस्ती घरगुती छंद म्हणून होईल. स्वतः वाढवलेल्या मेंढ्यांची लोकर वापरून अनेक कपडे विणले जातील. हा एक मोठा छंद, व्यवसाय आणि कलाविष्कार असेल.

प्रतिव्यक्ति, प्रतिवर्षी २ कि.ग्रॅ. लोकर लागते असं गृहीत धरून एक लाख चौ. फुटात चरणाऱ्या २५ मेंढ्यांपासून ८० किलो प्रतिवर्षी या दरानं लोकर मिळेल. शिवाय याच क्षेत्रावर इतरही गोष्टी (क्रीडांगणं, मधपोळी, छोटे बंधारे लाकडासाठीचे जंगल) असतील. कापूस, घायपात, ताग यासारख्या काही गोष्टी याच जमिनीत वाढतील आणि वेगळया प्रकारची उत्पादनं (पोती, सुतळया, काथ्या) त्यापासून बनवता येतील.

**कपड्यांचं घरगुती अंदाजपत्रक**

सध्या कपड्यांवर माझा काहीही खर्च होत नाही कारण जुन्या कपड्यांचा माझा स्टॉक. पण इतरांचा विचार करता, वाढत्या वयाच्या मुलांचे कपडे-चपला वगैरेंचा (बनवणे वा दुरुस्ती) खर्च ८० डॉलर प्रतिव्यक्ति प्रतिवर्ष.

# काम

आमच्यापैकी बहुतेक जण आठवड्यातून एक किंवा दोनच दिवस स्थानिक खाजगी उद्योगात किंवा सहकारी संस्थेत काम करतील. ते त्यासाठी पायी किंवा सायकलीनं जातील येतील. कामात त्यांचे मित्रच त्यांचे सहकारी असतील. **स्थानिक गरजा भागवण्यासाठी आणि गावाच्या उपयोगी पडण्यासाठी** त्यांचं लहानसं दुकान किंवा शेतीकाम चालेल. (इथे असं गृहीत धरलं आहे की या गावात विकासाच्या वाढीचा दर शून्य ठेवायचा आहे. आर्थिक असमानता जवळजवळ नाही, बेरोजगारी नाही, गरिबी नाही, सर्वांना नीट जगता येईल अशी मिळकत चांगलं काम करून मिळते आहे आणि त्यामुळे समाज आणि व्यक्तीच्या **गरजा** (इच्छा नव्हेत) भागत आहेत. या गोष्टी चंगळवादी-उपभोगवादी संस्कृतीत शक्य नाहीत.)

आठवड्यातले (काम करून) उरलेले ५ दिवस लोक आपला वेळ खूप महत्वाच्या गोष्टी करण्यात घालवतील. बागेत, छंद जोपासण्यात (उदा. कुंभारकाम, विणकाम, सुतारकाम), इतर कलाविष्कारात, समाजासाठी श्रमदान करण्यात, विविध समित्यांवर काम करण्यात, सांस्कृतिक कार्यक्रमांचं संयोजन करण्यात, सण साजरे करण्यात घालवला जाईल. वेगळ्या शब्दात सांगायचं तर काम आणि मोकळा वेळ यांच्यातला फरक जवळ-जवळ नष्ट होईल. काम आनंददायक बनेल.

कामावर जाण्यायेण्यासाठी खर्च शून्याच्या जवळपास असेल. म्हणून त्याचा वेगळा विचार इथे केलेला नाही.

**बैठक आणि शयन व्यवस्था (फर्निचर)**

साधं, स्वस्त, दणकट आणि टिकाऊ, आसपास मिळणाऱ्या साहित्यापासून (मुख्यतः लाकूड) फर्निचर बनवलं जाईल. ते दुरुस्त करण्यासारखं असेल. सामान्य लोकांनी घरात बनवलेलं असेल. काही वस्तू स्थानिक व्यवसायांकडून (जिथे चांगलं फर्निचर बनवणं हा कर्मचाऱ्यांचा आनंद असेल) विकत घेतल्या जातील. पण त्याही खूप टिकाऊ असतील. त्यांच्या किंमती फार नसतील. ज्या असतील, त्या (प्रत्येक आठवड्याला) दोन दिवस या दरानं मिळणाऱ्या पगारात परवडणाऱ्या असतील.

खेळणी, टोपल्या, बाग आणि साठवणगृह यासाठीचे कच्चे निवारे, पाळीव प्राण्यांची घरं, गाड्या, होड्या अशा अनेक गोष्टी लाकडापासून बनवल्या जातील. या सर्व गोष्टी घरगुती कर्मशाळा आणि छोटे उद्योग यांच्याकडून तयार होतील. प्लास्टिकचा वापर किमान असेल. चटया, बैठकी, पडदे, टोपल्या आणि टोप्या गावातल्याच गवतापासून बनतील. हात-अवजारांचा या सर्व वेळी उपयोग केला जाईल. काही ठिकाणी मात्र कमी शक्तीची यांत्रिक अवजारं वापरली जातील.

माझा या साठीचा खर्च जवळजवळ शून्य.

# उत्पादन आणि कारखाने

बहुतेक उत्पादनं घरगुती कर्मशाळांमधे, शेजारपाजारच्यांची मदत घेऊन आणि छोट्या उद्योगांमधेच केलं जाईल. हे सगळे हस्तकौशल्याच नमुने असतील, (मोठ्या प्रमाणातल्या उत्पादनासाठीच्या) औद्योगिक तंत्राचा वापर त्यात केलेला नसेल. एक उदाहरण घेऊ. कप-बशा आणि किटल्या, स्थानिक माती वापरून, माती काम आवडणारे स्थानिक कारागीर, स्थानिक लाकडाच्या भट्टीत तयार करतील. या संस्कृतीत लोकसंख्या स्थिर असेल. त्यामुळे दरवर्षी किती बशा फुटतात, या हिशेबानंच नव्या बशा तयार केल्या जातील. पैसा मिळवण्याच्या कामासाठी आठवड्यातले फक्त दोनच दिवस द्यायचे असल्यामुळे स्वतःच्या आणि शेजाऱ्याच्या कुटुंबासाठी कारागिरी करायला वेळ उपलब्ध असेल.

छोटे प्रादेशिक कारखाने सायकली, धातूची भांडी, कढया, कौलं, खिळे, स्क्रू, नट्स, बोल्ट्स्, बक्कलं, हॅक-सॉची पाती, काचेची भांडी, शिड्या, सुया, अवजारं, रंग (जैविक-तेल, दूध, चुना, माती पासून), ब्रशेस, पेयं

(वाइन, बीर, सरबतं), दोरे, दोर या शिवाय रेडिओ, स्टोव्हज्, फ्रिजेस् अशा वस्तू छोट्या प्रादेशिक कारखान्यात तयार होतील. या कारखान्यांतही मोठ्या प्रमाणावर वस्तू आणि साहित्याचा पुनर्वापर होईल. या वस्तू टिकाऊ असतील आणि दुरुस्त होऊ शकतील याची काळजी उत्पादन करतानाच घेतलेली असेल. फक्त इलेक्ट्रॉनिक सुटे भाग आयात करावे लागतील.
वस्तूंचे उत्पादन करण्याआधी त्यांचे आराखडे (डिझाइन्स) असे बनवले जातील की ज्यामुळे उत्पादित वस्तू टिकाऊ बनेल, दुरुस्त होऊ शकेल आणि किमान ऊर्जा, साधनसामग्री वापरेल. सध्या वस्तू डिझाइन करतानाच त्या जास्त टिकणार नाहीत, दुरुस्त होणार नाहीत किंवा नुसत्याच चांगल्या दिसतील अशी काळजी घेतली जाते.
या विविध वस्तूंचं उत्पादन करण्यासाठी आवश्यक ऊर्जेचा विचार पूर्वी केला आहे.

# पाणी

इथली नवी शेती, मोठी झाडं आणि बहुवर्षीय वनस्पती यांच्याशी निगडित असेल. त्यामुळे पाण्याचा प्रश्न कमी भेडसावेल. मांसाहार (विशेषतः मटण) किमान पातळीवर केला जाईल. पशूंना चरण्यासाठीचं गवत आणि इतर वनस्पतींना लागणारं पाणीही त्यामुळे कमी असेल.
स्थानिक पातळीवर पाणी साठवलं-मिळवलं जाईल. त्यात (पावसाचं पाणी) घराच्या छपरावरून मिळवून, झऱ्यांचं पाणी साठवून, नैसर्गिक विहिरींमधलं पाणी वापरलं जाईल. या पाण्याचा फार मोठ्या प्रमाणात पुनर्वापर होईल. संडासात स्वच्छतेसाठी, जंगलं वाढवण्यासाठी पुनर्वापर केलेलं पाणी असेल. त्यामुळे मोठ्या धरणांची, मोठ्या पंपिंग स्टेशन्सची आणि ते चालवण्यासाठीच्या नोकरशाहीची गरज भासणार नाही. पवनचक्क्या आणि छोटे विद्युत पंप पिण्याच्या पाण्यासाठी आणि एकदा वापरलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी उपयुक्त ठरतील.
सर्व सांडपाणी घरगुती पातळीवरच पुन्हा वापरलं जाईल त्यासाठी सगळ्या गावासाठीची वेगळी यंत्रणा अस्तित्वात असणार नाही. हे सांडपाणी (त्यात कोणतीही रसायनं नसल्यामुळे) परसबागेतल्या जमिनीतच पुन्हा वापरलं जाईल. कारखान्यांमधलं पाणी तिथेच प्रक्रिया करून पुन्हा वापरलं जाईल. कंपोस्ट पद्धतीच्या संडासामुळे पाण्याचा वापर कमी होईल. कचऱ्यापासून मिथेन बनवण्याच्या यंत्रणा आणि संडास यांच्यात उरणारं साहित्य परसबागेतल्या जमिनीत खत म्हणून पुन्हा वापरलं जाईल. पडणाऱ्या पावसाचं पाणी छोटे माती-बंधारे वापरून तळी आणि डबकी यांमधे साठवलं जाईल. त्यामुळे सिमेंट वा लोखंडी-पाइपची ड्रेनेज व्यवस्था गरजेची नसेल. प्रचंड पावसामुळे येणारे पाण्याचे लोंढे जमीन खणून गावरानाकडे वळवले जातील. जर पाइप्स कुठे असलेच तर ते जमिनीच्या वर असतील कारण त्यांची देखभाल करणं जास्त सोपं असतं. जिथे शक्य असेल तिथे उंचावर पाणी साठवलं जाईल आणि नंतर गुरुत्वाकर्षणाचा वापर करून ते खालच्या घरांना, रानांना, कारखान्यांना पुरवलं जाईल. त्यामुळे पंपांच्या ऊर्जेत बचत होईल.
**खर्चः**
टाक्या, छोटे तलाव, लहान बंधारे वापरून साठवलेलं पाणी घरगुती कामांसाठी, परसबागा, सामाजिक बागा, छोटी शेतं यासाठी वापरलं जाईल. ही व्यवस्था साधी असेल आणि सहजपणे तिची देखभाल करता येईल. ते काम स्वयंसेवकच श्रमदानानं करतील. ही व्यवस्था स्थिर असेल, म्हणजेच त्यात यानंतर देखभाल-डागडुजी खेरीज नवी बांधकामं होणार नाहीत.

# साधनसामग्री

बहुतेक बांधकामं माती, गवताचे भारे, दगड, बांबू आणि लाकूड यापासून होईल. धातू आणि प्लास्टिक यांचा (ते उत्पादन ऊर्जाभक्षक असल्यामुळे) किमान वापर होईल. काच, लोखंड, सिमेंट आणि ॲल्युमिनियम यांचा वापर किमान प्रमाणात केला जाईल. विशेषतः ॲल्युमिनियम आणि सिमेंटचं उत्पादन अगदी थोड्या प्रमाणात

स्थानिक कारखान्यांत केलं जाईल. त्यासाठी लागणारी ऊर्जा (अतिरिक्त उपलब्ध असताना) सोलर वा इतर नैसर्गिक उगमांपासून घेतली जाईल. रसायनं, सांधणारं साहित्य (adhesives), औषधं, रंग, वंगण, धागे वनस्पतींपासून बनवण्यासाठी संशोधनावर भर दिला जाईल. धोकादायक कृत्रिम रसायनांची गरजच रहाणार नाही. अशा कृत्रिम वस्तू टाळण्याच्या दृष्टीनं आरेखन करतानाच विचार केला जाईल. उदा. फर्निचर बनवताना बिजागिऱ्या, स्क्रू यांची गरज राहणार नाही अशा प्रकारच्या पद्धती (खाच कुसु वगैरे) अवलंबता येतील.

घर बांधण्यासाठी लाकूड वापरलं जाणार असलं तरी ते टिकाऊ असल्यामुळे अशा लाकडासाठी जंगलतोड मोठ्या प्रमाणात होणार नाही. असं लाकूड केवळ डागडुजीसाठीच वापरलं जाईल. लाकडाचा दुसरा उपयोग स्वयंपाकासाठी आणि खोली गरम ठेवण्यासाठी असेल. पण मुळातल्याच उष्णतारोधक खोल्यांमधे हे लाकूड कमी प्रमाणावर लागेल.

धागे, रसायनं, धातु यासारख्या वस्तू मोठ्या राष्ट्रीय कारखान्यांतून स्थानिक छोट्या कारखान्याना दिल्या जातील. कागदाची मागणी स्थानिक लाकडापासून उत्पादन करून आणि जुन्या कागदाचा पुनर्जन्म घडवून पूर्ण करता येईल. लोखंडी पत्र्याच्या छताऐवजी हळूहळू स्थानिकरित्या बनवलेली कौलं वापरता येतील.

सिमेंट उत्पादन हे ऊर्जा खाणारं असूनही महत्वाचं आणि गरजेचं आहे. परंतु त्याच्या वापराचं प्रमाण कमी असेल. कारण एकदा का हरित-कचरा-पाचक यंत्रणा किंवा टाक्या तयार झाल्या, की मग फक्त त्यांच्या देखभालीसाठीच सिमेंटची गरज भासेल. मोठी धरणं, मोठे पूल, मोठे रस्ते तयार करायचेच नाहीत. लहान बंधारे घालून पाणी अडवण्यात येईल. त्यातल्या पाण्याचा वापर करून छोटी विद्युतजनित्रंही चालवता येतील.

मोठे प्राणी मांसासाठी पाळलेच जाणार नाहीत. त्यामुळे चामडं ही एक दुर्मीळ वस्तू असू शकेल. त्याचा पर्याय लाकूड, जाड धागे वापरून बनवावा लागेल.

# वाहतूक आणि प्रवास

कामाला जाण्यासाठी वाहतूक गरजेची नसेल. कारण कारखाने आणि कचेऱ्यांमधे करण्याचं काम अगदीच कमी असेल. कामाच्या जागा इतक्या जवळ असतील की तिथे पायी किंवा सायकलनं जाता येईल. जे थोडेसे मोठे कारखाने असतील ते गावाच्या रेल्वे-स्टेशन जवळ असतील.

घरांच्या जवळच छोटी शेतं, जंगलं, तलाव, लहान कारखाने, पवनचक्क्या, कला-कौशल्य-कारागीर, नाट्य मंडळं, ग्रंथालयं, समाजगृहं अशा गोष्टी वेळ चांगला घालवायला उपयोगी पडतील. त्यामुळे या कारणांसाठी प्रवास करणं (आत्तासारखं) गरजेचं नसेलच.

थोड्याशा चारचाकी गाड्या, ट्रक, बुलडोझर्स यांची गरज भासेल. पण सर्वात जास्त उपयोग केला जाईल तो सायकलींचाच. थोड्या प्रमाणात रेल्वे आणि बसेसनी प्रवास केला जाईल. बैलगाड्या आणि टांगे यांचा वापर मालाच्या ने-आणी करता केला जाईल. त्यांना इंधनाची गरज नसते. ते स्वत:ला (खाऊन) ताजेतवाने करू शकतात. ते पुनरुत्पादन करतात, त्यांना महाग सुट्या भागांची गरज नसते किंवा महागड्या रस्त्यांची सुद्धा. जुन्या शहरांतले मोठे रस्ते खणून तिथे बागा तयार केल्या जातील. जुन्या इमारतींचे सिमेंट तुकडे मातीच्या

इमारतींच्या पायांत दगड म्हणून वापरता येतील. पाडलेल्या अनेक सिमेंट इमारतीचे भाग, जाळ्या प्राण्यांच्या घरांची कुंपणं म्हणून वापरता येतील. रेल्वे आणि बसेस यांचं उत्पादन हे मात्र मोठ्या कारखान्यांमधे केलं जाईल.

जहाजं, ट्रक्स आणि विमानं यांचं उत्पादन नगण्यच असेल. कारण फार लांबवर प्रवास करण्याची वेळच येणार नाही. आंतर्राष्ट्रीय प्रवास जवळजवळ नसेलच. कारण त्यासाठी लागणारं इंधन फार दुर्मीळ असेल. अशा प्रवासाची गरजही नसेल. असा प्रवास फक्त शैक्षणिक आणि सांस्कृतिक कामासाठी केला जाईल. आयुष्यात एखादाच असा प्रवास शक्य होईल. पण वाऱ्यावर चालणारी शिडाची जहाजं वापरायला हरकत नाही. अशा त्या जग-प्रवासात तुमच्या पदवी परीक्षेचा अभ्यास पूर्ण होऊ शकेल.

असा प्रवास न करता येणं ही उपासमार समजायची का ? तसं अनेकांना वाटू शकेल. पण आजच जगातली निम्मी लोकसंख्या टूरिझम या चैनीचा विचार करू शकत नाही. हे लक्षात घेता, उद्याच्या इंधनटंचाईमुळे सगळेच लोक प्रवास, वाहतूक, आंतर्राष्ट्रीय व्यापार या गोष्टींना नकार देतील.

आपण फार प्रवास करणार नाही कारण आपल्या जवळपासच करण्यासारख्या अनेक गोष्टी असतील. करमणुकींचे अनेक प्रकार असतील. (मी सुटीच्या दिवसात, आठवड्याच्या अखेरीला घरीच थांबतो कारण घर आणि परसबागेतच खूप गोष्टी माझी वाट पहात असतात.) मोकळा-वेळ घालवण्यासाठी एक समिती अनेक सण, समारंभ, मैफिली, सहली, धाडसी-प्रवास, नृत्यं किंवा हुरडा पार्ट्या आयोजित करीत राहील.

ऊर्जा-खर्चः ६० व्यक्ती-कि.मि. चा प्रति सप्ताह प्रवास विचारात घेता, (एक लिटर पेट्रोलमधे ११ कि.मि. या हिशोबानं) ०.६७५ लिटर पेट्रोल प्रतिव्यक्ती प्रति आठवडा म्हणजे १५४४ मेगा जूल प्रति वर्षी प्रति व्यक्ती ऊर्जा वापरली जाईल.

# आरोग्य आणि औषधं

भरपूर शरीरश्रम आणि स्वच्छ ताजं अन्न यामुळे सर्वांच्या आरोग्यस्थितीत आमूलाग्र बदल होईल. त्या अनुषंगानं येणाऱ्या सगळ्या गोष्टी (प्रशिक्षण, यंत्रं, ऊर्जा वगैरे) बिनगरजेच्या ठरतील.

शारीरिक आरोग्याशिवाय मानसिक आरोग्यही उत्तम असेल. असुरक्षितता, बेरोजगारी, गरिबी, एकटेपणा, ताणतणाव, अतिरेकी कामाचे तोटे, कामाला जायला यायला लागणारा अतिरेकी वेळ, घरकर्ज फेडण्याबद्दलची काळजी या सगळ्यातून त्यांची मुक्तता होईल. प्रत्येकाला आधार आणि सुरक्षितता वाटेल असा सामाजिक पाठिंबा मिळेल. जीवनाची तणावमुक्त गती, सर्वांच्या कल्याणार्थ असलेल्या प्रकल्पांवर काम, जीवनाला आलेला अर्थ आणि या साऱ्यासाठी व्यक्तीची बांधिलकी प्रत्येकाला अनुभवता येईल. व्यक्तीला भेडसावणारी अडचण सगळ्या समुदायाला लगेच समजेल आणि समुदाय व्यक्तीला त्यातून बाहेर पडण्यासाठी मदत-मार्गदर्शन करील. (लडाख मधे असं घडतं. गावातले ज्येष्ठ नागरिक व्यक्तीला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी मार्गदर्शन करतात.) अंमली पदार्थ आणि दारुचे दुष्परिणाम, गुन्हेगारी, घरातली हिंसा, गाड्यांचे अपघात, अती खाण्यामुळे होणारे रोग, अचानक घडणारे हिंसक प्रसंग किती असणार ? जीवनाला हेतु असेल, निर्मितिक्षम छंद असतील, पाठीशी उभा रहाणारा- कौतुक करणारा- आदर देणारा समुदाय असेल तर असे घातक प्रसंग

असतील- शून्य !

आरोग्य आणि औषध सेवा स्थानिक पातळीवरच कार्यरत असतील. पण थोडी हॉस्पिटल्स विशेष सेवा देतील आणि खास प्रशिक्षण देतील. औषधं आणि आरोग्य उपकरणं या गोष्टी अजूनही दूरून मागवाव्या लागतील. आरोग्यसेवां संबंधी मोठ्या प्रमाणात संशोधन करावं लागेल. आरोग्य व्यवसाय मुख्यतः समाजसेवा म्हणून केला जाईल आणि त्याचा मोबदला करांच्या रूपानं लोक स्वेच्छेनं देतील. हा व्यवसाय मूलतः रोग झाल्यावरच्या उपचारांपेक्षा रोग-प्रतिबंधक सेवांवर केंद्रित असेल.

आरोग्य समित्यांचा भर प्रामुख्यानं अन्न आणि शारीरिक-मानसिक तंदुरुस्तीच्या मदत आणि मार्गदर्शनावर असेल. आणि या साऱ्यांचा केंद्रबिंदू **सामाजिक आरोग्य** हा असेल. समुदायाची एकजूट, नीतिधैर्य, सद्असद्विवेकबुद्धी इतरांना मदत करण्याची इच्छा, श्रमदान आणि मैफलींमधे सहभाग या वरून सामाजिक आरोग्याचा निर्देशांक ठरेल. आपण आपली सायकल कुलूप न लावता रस्त्यावर लावू शकू !

अशा वेगवेगळ्या कारणांसाठी सामाजिक आणि वैयक्तिक आरोग्याचा खर्च जवळपास शून्य असेल.

# वृत्तपत्रं आणि संवाद

या दोन्ही गोष्टी फक्त स्थानिक पातळीवर कार्यरत असतील. महत्वाची स्थानिक माहिती लोकांपर्यंत पोचवणं, स्थानिक अडचणींविषयी चर्चा घडवून आणणं या शिवाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बातम्या आणि माहिती इतर ठिकाणांहून आणून स्थानिक लोकांपर्यंत पोचवणं ही वृत्तपत्रांची कामं असतील.

स्थानिक विषयांसंबंधी विचार करणं, चर्चा घडवून आणणं, अडचणी सोडवण्याच्या प्रक्रिया-कृती, ते करण्यातला आनंद, फायदे आणि त्रास यांकडे लोकांचं लक्ष वेधून घेणं हे काम वृत्तपत्रं करतील. ही वृत्तपत्रं म्हणजे आपल्या संवेदनशक्तीची केंद्रं असतील. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विषयांकडे त्यांचं फार लक्ष नसेल, मग बहुराष्ट्रीय करमणूक कंपन्यांनी पेटवलेले विषय सोडूनच द्या.

जोवर भरपूर चर्चा होत नाही, विचारांची देवाणघेवाण होत नाही, सर्वोत्तम पर्याय विचारात घेतले जात नाहीत आणि कृती कार्यक्रम कसे चालले आहेत त्यावर लक्ष ठेवलं जात नाही तोवर स्थानिक समुदाय कार्यक्षम बनणार नाहीत. हे सगळं, गावाचं सगळ्यात जास्त भलं कशात आहे तिकडे समुदायाचं एकमत होण्याकडे गेलं पाहिजे. प्रत्यक्ष गाठीभेटींतून हे होईलच. पण त्या शिवाय, स्थानिक पातळीवर निर्माण केलेल्या रेडिओ कार्यक्रमांतून हे होईल. असे कार्यक्रम शैक्षणिक दृष्ट्याही उपयुक्त ठरतील. नव्या कल्पना आणि सुधारणा सर्वांपर्यंत पोचवायला उपयोगी ठरतील.

रेडिओ कार्यक्रमांपैकी बरेचसे कार्यक्रम या क्षेत्रातले तज्ञ नव्हे तर नागरीकच सादर करतील. भाषणं आणि मुलाखती स्थानिक कलाकार, कारागीर, विचारवंत आणि तज्ञ यांच्याच असतील. हे चालवण्यासाठी संचालक मंडळ लोकांतर्फे निवडलं जाईल. हे मंडळ लोकांच्या प्रतिसाद-प्रतिक्रियांवर आधारित बदल-सुधारणा कार्यक्रमात करतील. रेडिओवर जाहिराती नसतील पण नव्या उत्पादनांची माहिती, नव्या कल्पना, उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोचवली जाईलच. हे सर्व काम बव्हंशी स्वयंसेवकच करतील.

टी.व्ही. असेल पण टी.व्ही. ला फारसं महत्व नसेल. टी.व्ही. पहाण्यापेक्षा लोक हा वेळ अधिक चांगल्या प्रकारे घालवतील. (अमेरिकेत टी.व्ही. पहाण्याचा वेळ प्रतिव्यक्ती प्रतिदिन सुमारे ४ तास इतका आहे !) इतर देश आणि तिथल्या संस्कृती या बद्दल भरपूर आणि तपशिलवार माहिती देणारे कार्यक्रम सादर केले जातील. त्यामुळे आंतर्राष्ट्रीय प्रवासाची उणीव थोड्या प्रमाणात भरून येईल.

सगळी माहिती-संसाधनं लोकांच्या एकत्रित मालकीची असतील आणि सहकारी तत्वावर चालवली जातील. एकही खाजगी माहिती संस्था अस्तित्वात नसेल. ही नवी संस्कृती लोक किती विचारक्षम, व्यवस्थित माहिती मिळालेले आणि जबाबदार आहेत यावरच अवलंबून आहे. हीच तीन कामं माहिती-संसाधन संस्थांना प्रामुख्यानं करायची आहेत. त्यामुळे नियंत्रण आणि संचालक मंडळं गावसभांमधूनच निर्णय घेतील. रुपर्ट मरडॉक सारखी अतिश्रीमंत व्यक्ती आपली व्यक्तिगत मतं त्यामुळे बहुसंख्यांवर लादणार नाही, ठराविकच उमेदवार आणि पक्षाला प्राधान्य देणार नाही, परराष्ट्रसंबंध कसे असावेत याबद्दल लोकमत ठरवणार नाही किंवा युद्ध लादणार नाही.

नव्या संस्कृतीत संगणक आणि माहिती-तंत्रज्ञानाचं स्थान काय असेल ? उपयुक्त पण केंद्रस्थानी नसलेलं. संगणक, इंटरनेट, उपग्रह, अतिउच्चशिक्षित वैज्ञानिक आणि चतुर तंत्रज्ञ यांच्यावर अवलंबून न रहाता गरजे पुरता त्यांचा उपयोग करून घेतला जाईल. संशोधन, आरोग्य-औषधं, माहिती साठवणूक आणि शिक्षण इतक्याच बाबतीत उच्च तंत्रज्ञानाचा उपयोग राहील. व्यवसाय, हिशेब, वृत्तवितरण, करमणूक आणि मोकळा वेळ घालवण्याचं साधन या दृष्टीनं हे तंत्रज्ञान वापरलं जाणार नाही. छोटे उद्योग आणि शेतं यांना संगणकाची गरजही भासणार नाही. वाइटात वाईट घडून उपग्रह आणि संगणकाचे कारखाने बंदच पडले तर आम्ही त्याशिवायच काम करू. १९६० सालचं तंत्रज्ञान वापरू. १९६० नंतरच्या दशकात आम्ही अन्नोत्पादन आणि फर्निचर निर्मिती संगणक-उपग्रहाच्या मदतीशिवाय करत होतोच. सुंदर जेवणं, घरं, कपडे, फर्निचर, सण, सार्वजनिक इमारती, विविध उपक्रम आणि मैफली आम्ही ६०च्या दशकात उत्तम करू शकत होतो. (खरं म्हणजे १७६० सालीही करत होतो.)

संगणक आणि उपग्रहाचे भाग जगात अगदी कमी ठिकाणी प्रचंड मोठ्या कारखान्यांत बनवले जातील. या वस्तू अशा आहेत ज्यांची **गरज भासली तर** आंतर्राष्ट्रीय व्यापाराद्वारे त्या गावात आणल्या जातील.

**खर्चः**

टी.व्ही. आणि संगणक मी करमणुकीसाठी वापरत नाही. दिवसभर मी फक्त खिशातला रेडिओ ऐकतो. मला टी.व्ही. आणि संगणक जवळपासच्या सहकारी कर्मशाळेत ठेवलेला आवडेल. या बाबतचा माझा खर्च जवळजवळ शून्य.

# निवृत्त जीवन, वृद्धावस्था आणि खास गरजा

अनुभवी, वयोवृद्ध लोक गावाच्या प्रगतीत मोठा हातभार लावतील. प्रत्यक्ष उत्पादनात, सामाजिक व्यवस्था सुरळीतपणे चालवण्यासाठी वृद्धजन त्यांची हुशारी आणि शहाणपण वापरतील. विशेषतः स्थानिक लोकांबद्दल, परिस्थितीबद्दल आणि इतिहासाबद्दल त्यांची माहिती आणि शहाणपण उपयुक्त ठरेल. निवृत्त होण्याचं वय

ठराविक नसेल, पण मुळात अगदीच कमी लोक निवृत्त होतील. हे लोक त्यांच्या इच्छेनुसार आणि हळूहळू त्यांची कृतिशील जीवनाची पातळी कमी करतील. त्यांचं कौशल्य, अनुभव आणि वेळ वाया जाणार नाही त्यांचा सल्ला वापरला जाईल याची काळजी नवा समुदाय घेईल.

अतिवृद्ध आणि अपंग व्यक्तींची काळजी समित्यांमार्फत, श्रमदान स्वयंसेवकांमार्फत आळीपाळीनं आणि नियमांवर बोट न ठेवता घेतली जाईल. केवळ दोनच दिवस काम असल्यामुळे उरलेल्या पाच दिवसात अनेक जण अशा व्यक्तींकडे स्वयंसेवक गप्पा मारायला किंवा मदतीसाठी जातील. वृद्धांची काळजी वृद्धाश्रमात न जाता त्यांच्या घरीच घेतली जाईल. छोटी स्थानिक इस्पितळं आणि नर्सिंग-सेवा मंडळं मुख्य वस्तीच्या नजीकच असतील. हे काम करण्यासाठी एखादा सामुदायिक कर स्वेच्छेनं लोक भरतील. पण मुख्यतः हे काम श्रमदान स्वयंसेवक विनामूल्य करतील.

अशा वृद्ध आणि अपंग व्यक्तींची अवस्था आणि व्यवस्था आजपेक्षा कितीतरी चांगली असेल. माहितीच्या लोकांकडून त्यांची गावातच काळजी घेतली जाईल. त्यांच्या आजूबाजूला चाललेले गावातले अनेक उपक्रम ते पाहू शकतील, त्यात कदाचित सहभागी होऊ शकतील. आजच्या त्यांच्या अवस्थेशी या सगळ्याची तुलना करून पहा. त्यांना करायला काही काम नाही. कशात सहभाग नाही. आयुष्याचा आलेला कंटाळा आणि एकटेपणा यामुळे जगासाठी आपण निरुपयोगी ओझं बनलो आहोत अशी त्यांची धारणा होऊन बसते. मग अतिशय खर्चिक व्यावसायिक नोकरांवर अवलंबून रहावं लागतं. (कंपन्या "आरोग्य" या क्षेत्राकडे अतोनात पैसे मिळवण्याची संधी म्हणून पहातात. तिथे असणाऱ्या व्यावसायिक "संधींवर" त्या तुटून पडल्या आहेत. साध्या लोकांकडून ही सेवा देता येणं शक्य आहे पण ती न दिल्यामुळे वृद्ध रुग्णाच्या बचतीचा ओघ "आरोग्य कंपन्यांच्या" भागधारकांकडे वळवण्यात या कंपन्या यशस्वी ठरत आहेत.)

या नव्या संस्कृतीत वृद्धांना त्यांच्या मानसिक-शारीरिक आरोग्याची हमी असेल. आताच्या व्यवस्थेत निवृत्तीनंतरची पैशाची व्यवस्था पाहणाऱ्या सल्लागाराच्या (तो प्रामाणिक असेल तर) कौशल्यावर वृद्धाचं भवितव्य अवलंबून असतं. प्रामाणिकपणा आणि कौशल्य दोन्ही कमी पडलं तर वृद्धाची आर्थिक स्थिती एका रात्रीत हलाखीची होऊ शकते. चंगळवादोत्तर नव्या संस्कृतीत सर्व सदस्यांची जबाबदारी समुदायावर असेल. त्यात चळवळ्या तान्ह्या बाळा पासून ते आजारी वृद्धांपर्यंत सारे येतील. मध्ययुगीन युरोपमधे (इ.स. १२०० ते १७००) अशा तऱ्हेची व्यवस्था अस्तित्वात होती. अतिरेकी व्यक्तिस्वातंत्र्य आणि बाजार यांचा उदय त्यावेळी झाला नव्हता.

या वृद्ध-कल्याण व्यवस्थेत, सरकारी मदत फार मर्यादित असेल. शून्य विकासदराच्या या अर्थव्यवस्थेत, अतिरिक्त गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजावर अवलंबून रहाता येणार नाही. (एका प्रश्नाची दखल विशेषत्वानं घ्यायला लागेल. ती म्हणजे ज्या वृद्ध व्यक्ती बाहेरून या व्यवस्थेत दाखल होतील त्यांचे प्रश्न वेगळे असतील. एका व्यवस्थेतून दुसऱ्या व्यवस्थेत येताना त्या व्यक्तीच्या बचत रकमांचा विनियोग कसा करायचा या विषयी विचार करावा लागेल.)

# कायदेकानू

नव्या संस्कृतीत कायदेकानूंची गरज कमी भासेल. वाद आणि तडफड यांनी सध्याचा समाज बुजबुजलेला आहे. याचं कारण आहे स्पर्धा. बाजारातली, विकासाला परवानगी मिळवण्यातली, मालमत्ता, हक्क आणि संपत्ती यांच्या विषयीची स्पर्धा आजच्या समाजात किचकट कायदेकानूंची गरज निर्माण करते. नव्या संस्कृतीतलं वातावरण स्पर्धेचं नाही तर सहकार्याचं असेल. संपत्ती आणि मालमत्ता यांना अतिरेकी महत्व नसेल. स्थिर अर्थव्यवस्थेचं एक मानक म्हणजे किमान कायदेकानूंची गरज असही म्हणता येईल.

या संस्कृतीत प्रत्येकाला जे गरजेचं ते मिळेल. प्रत्येकाची अन्न-वस्त्र-निवाऱ्याची सोय होईल आणि प्रत्येकाला निर्मिती करणारं काम मिळेल. इथे बेरोजगारी, गरिबी नसेल. कोणी संधी मिळण्यातून वगळलं जाणार नाही. कोणी मागे रहाणार नाही. स्पर्धेत जो एकजण जिंकला तो सगळं घेऊन जाणार, बाकीचे सगळे हरणार. ही आजची अवस्था नष्ट होईल. त्यामुळे गुन्हेगारी निर्माण करणारी कारणंच नष्ट होतील.

नव्या व्यवस्थेत कायदेकानू किमान असल्यामुळे प्रचंड बचत होईल. प्रत्येकाला समाजात चांगले स्थान आणि योगदान देण्यासाठी भूमिका असेल. त्यामुळे पोलिस, तुरुंग, कोर्ट्स्, जजेस, वकील यांची गरजच रहाणार नाही. वाद नसतील असं नाही. पण ते सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवरच समित्या नेमल्या जातील. त्यात अनुभवी ज्येष्ठांचा समावेश असेल. हे ज्येष्ठ असे वाद निपटण्यासाठी सगळयांना (निःशुल्क) मदत करतील. अशी पद्धत आजही काही आदिवासींमधे आहे. आजच्या मानानं केवळ ५ % कायदे-उद्योगाची नव्या संस्कृतीत गरज भासेल.

# शिक्षण

चंगळवादी संस्कृतीत असलेल्या शिक्षणाच्या तुलनेत नव्या संस्कृतीत शिक्षणाची उद्दिष्टं आणि प्रक्रिया पूर्णपणे वेगळी असेल. नोकरीची हमी देणं आणि चंगळवादात विशेष चैन करण्याची हमी देणं ही आजच्या शिक्षणाची उद्दिष्टं आहेत. आनंददायक आणि अर्थगर्भ आयुष्य जगण्यासाठी चांगल्या समाजात योगदान देता यावं म्हणून विद्यार्थ्याला तयार करणं हे नव्या संस्कृतीत शिक्षणाचं उद्दिष्ट असेल. या प्रकारच्या शिक्षणासाठी खर्च अत्यल्प असेल. रोजचं सामुदायिक आयुष्य सुरळीत चालू ठेवण्यासाठी अनेक व्यावसायिक रोज काम करत असतील. त्यांच्या समवेत काम करून, थेट शिक्षण विद्यार्थ्यांना मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे व्यक्तिगत लक्ष राहील. अधिकृत शाळा-महाविद्यालयांची गरज राहणार नाही. संपूर्ण समाजच शिक्षक, विद्यार्थी आणि शाळा होईल. अगदी कमी प्रमाणात व्यावसायिक शिक्षकांची गरज असेल. पण प्रामुख्यानं सगळा समाजच शिक्षक बनेल.

अभ्यासक्रम आणि शिक्षण यांचा आजच्या व्यवस्थेत फारसा संबंध राहिलेला नाही. शिक्षक शिकवतात पण विद्यार्थी शिकतोच असं नाही. व्यवसाय शिक्षण देणारे शिक्षक (उदा. इंजिनिअरिंग आणि मेडिकल) महत्वाचे आहेत पण त्यांची संख्या आजपेक्षा खूपच कमी असेल. व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या कार्यपद्धतीच इतक्या साध्या असतील की सर्वसाधारण कारागीरच व्यवसायशिक्षणाचं काम करू शकतील. मी स्वतः जलवाहिनी व्यवस्था (प्लंबिंग), १२ व्होल्ट इलेक्ट्रिकल व्यवस्था, लोहारकाम, सुतारकाम आणि बांधकाम करू शकतो. या साध्या अर्थव्यवस्थेत प्रचंड उत्पादन नाही, अवजड उद्योग नाहीत, गुंतागुंतीच्या जागतिक यंत्रणा नाहीत. मग

अतिशय किचकट तंत्रज्ञान जाणणाऱ्या व्यक्तींची गरजच काय ? वकील, अर्थसल्लागार, सुरक्षा विश्लेषक, विपणन तज्ञ किंवा सी.इ.ओ. यांची बातच सोडा !

आमची विद्यालयं शिक्षणावर (अभ्यासक्रमावर नव्हे) लक्ष केंद्रित करतील. त्यासाठी खर्चिक प्रयोगशाळांची आणि यंत्रसामग्रीची गरज असणार नाही. (विकिपिडिया, चर्चा गट, भेटी गाठी, कार्यानुभव आणि कला-कौशल्य कारागिरांशी थेट संपर्क इतकं पुरेसं नाहीका ?)

# कल्याणकारी उपक्रम

गुन्हेगारी, ताणतणाव, निराशा, बेरोजगारी, गरिबी अशा गोष्टी किमान पातळीवर असल्यामुळे कल्याणकारी उपक्रमांची वेगळी गरज भासणारच नाही. समुदाय, ज्येष्ठ आणि शेजारीपाजारी यांच्या बळावर अशा अडचणी उद्भवल्याच तर सोडवता येतील. त्यासाठी कोणी व्यावसायिक तज्ञाची गरज नसेल.

# मोकळा वेळ

चंगळवादी संस्कृतीत हा एक अतिशय खर्चिक भाग आहे. त्यामुळे नव्या संस्कृतीत हा बचतीचा मोठा मार्ग ठरतो. नवी संस्कृती ही भरपूर मोकळा वेळ असलेली संस्कृती आहे. तो कसा आनंदात घालवायचा याचे अनेक मार्ग या जीवनात आहेत. सध्या मोकळा वेळ घालवण्यासाठी बड्या कंपन्यांतल्या व्यावसायिकांनी सादर केलेले कार्यक्रम, खेळ (टी.व्ही. कार्यक्रम, संगणकीय खेळ) यातून येणारा अनुभव (विकत) घ्यावा लागतो. त्याशिवाय बाजारानं पादाक्रांत केलेले खर्चिक-प्रवास, बाजारानं (विकत) देऊ केलेली खाद्यं-पेयं वेळ घालवायला आहेतच. या सगळ्याची आत्मिक गुणवत्ता ऋणात्मक नसली तरी शून्य तरी निश्चित आहे. टी.व्ही. वरच्या मूर्खपणाच्या मालिका, खेळ, रिॲलिटी शोज आणि गुन्हेगारी-चित्रपट यात हीच गोष्ट पहायला मिळते. संगणकीय खेळातले विशेषतः हिंसक खेळ हे तर नकारात्मक गुणवत्तेचेच निदर्शक आहेत. चंगळवादी संस्कृतीत मोकळा वेळ बहुतांशी खरेदी करण्यात जातो. या खरेदीत खर्चिक सेवा, रॉक मैफलींची महागडी तिकिटं आणि साठमारी पद्धतीच्या (क्रिकेट, टेनिस किंवा फुटबॉल सारख्या) खेळांची तिकिटं येतात.

नवी संस्कृती मोकळ्या वेळात करता येणाऱ्या कार्यक्रमांनी समृद्ध आहे. या गावांत उत्तम संगीतकार, गायक, कथा सांगणारे, अभिनेते, विनोदवीर, नाटककार आहेत. ते आज झाकले गेले आहेत कारण जागतिक करमणूक कंपन्यांना केवळ थोडेसेच (त्यांना सोयीचे) सुपरस्टार असणं गरजेचं वाटतं. या कलाकारांची भरभराट या नव्या संस्कृतीत होईल. त्यांना कला जोपासायला भरपूर वेळ मिळेल. सण-समारंभात त्यांनी सादर केलेल्या (बहुतांशी निःशुल्क) कलांचं समाजाकडून कौतुक होईल.

खूपसा मोकळा वेळ निर्मितिक्षम सामाजिक उपक्रमांमधेच घालवला जाईल. परसबाग फुलवण्यात, उपयुक्त वस्तू बनवण्यात आणि कला-कौशल्याची कामं करण्यात हा वेळ जाईल. काही वेळ वाचनात, विचार करण्यात, शिकण्यात जाईल. आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासाला आवश्यक (पोहायला शिकणं, वक्तृत्व वगैरे) त्या गोष्टींसाठी वेळ दिला जाईल.

नव्या समाजाचं आणि त्याच्या उपक्रमांचं निरीक्षण करणं हाही एक मोकळा वेळ चांगला घालवण्याचा मार्ग

असू शकेल. हिरव्यागार सुंदर गावात मारलेला फेरफटका, ते करताना लोकांशी मारलेल्या गप्पा, माहीत असले-नसलेले छोटे कारखाने आणि शेतं यांना दिलेल्या भेटी ही त्याची काही उदाहरणं. स्वयंसेवक म्हणून नाव नोंदवणं आणि श्रमदान करणं हाही वेळ चांगला घालवण्याचा महत्वाचा मार्ग ठरतो. गावचे सण, समारंभ, मैफिली, नृत्यं, भेटीगाठी आणि साहस-सहली यासारख्या गोष्टी तर गावची करमणूक समितीच घडवून आणेल.

या नव्या वातावरणात करमणूक विकत घेण्याची वृत्ती आणि गरज नसेलच. आपल्याला आवडणाऱ्या उपक्रम आणि कामांत लोक गुंतलेले असतील. वेळ घालवण्यासाठी परदेशप्रवास ही तर लांबचीच गोष्ट !

**माझा करमणूक खर्च:**

सुटीच्या दिवशी मी बाहेर जात नाही. चित्रपट किंवा उपाहारगृहात क्वचितच जातो. कारण माझा वेळ मला आवडण्याऱ्या गोष्टीतच मी व्यतित करत असतो. माझ्या आजूबाजूला आणखी कलाकार, विद्वान, कारागीर असतील तर माझं आयुष्य आणखी समृद्ध होईल. मला बरेच प्रश्न पडत असतात. त्यांची उत्तरं देऊ शकतील अशा तज्ञांची मी वाट पहातो. गावच्या ग्रंथालयाची वर्गणी आणि गरज पडली तर सामुदायिक इंटरनेट या व्यतिरिक्त मला पैसा खर्च करावा लागेल असं वाटत नाही. हा खर्च तुलनेनं क्षुल्लक आहे.

# ऊर्जा

स्पष्ट आणि बिनचूक असा ऊर्जेचा हिशोब आज मांडता येईल असं मला वाटत नाही. पण ऊर्जा खर्च करणाऱ्या कृती आणि यंत्रांची दखल मी अशी घेईनः

चंगळवादी संस्कृतीच्या तुलनेत नवी संस्कृती अगदी कमी ऊर्जा खर्च करेल. कमी उत्पादन आणि कमी उपभोग, उष्णतारोधक-मातीच्या विटांनी बांधलेली घरं, वस्तूंचा पुनर्वापर, सायकल वरून प्रवास, जवळच असलेले खेळ-सांस्कृतिक-करमणूक उपक्रम, आणि आयात केलेल्या किमान वस्तू यामुळे ऊर्जा पातळी किमान असेल.

जवळजवळ सर्व ऊर्जा स्थानिकरित्या निर्माण केली जाईल. पवनचक्क्या, पाणचक्क्या, कचरा-पाचक यंत्रणा, सोलर पॅनेल्स, वाहनांसाठी जैविक इंधनं हे ऊर्जानिर्मितीचे मार्ग असतील. घोडे, बैल शेतं नांगरण्यासाठी वापरले जातील. थोड्या प्रमाणात वाहतुकीसाठीही टांगा किंवा बैलगाडी वापरली जाईल कारण वेगवान वाहतुकीची गरजच नसेल. स्वयंपाकासाठी लाकूड-चुली आणि जैविक-कचरा-पाचक यंत्रणेतून मिळणारा मिथेन वापरला जाईल.

उष्णतारोधक माती-विटांच्या इमारतींना वेगळी एअर कंडिशनिंगची गरज नसते. लाकूड कापण्यासाठी उष्णतेवर चालणारी स्टर्लिंग इंजिनं, लाकूड इंधन म्हणून वापरून चालणारी विद्युतजनित्रं, यासारख्या यंत्रणा वापरल्या जातील. जास्त ऊर्जा लागणारं काम असेल तर ते सूर्य प्रखर असताना किंवा वारा जोरदार वाहत असताना केलं जाईल. छोटे बंधारेसुद्धा वीजनिर्मितीसाठी वापरले जातील. जंगलांपासून लाकूड मिळेल आणि त्यापासून वीज, जैविक-इथेनॉल. मेणबत्त्या आणि वनस्पतिजन्य तेलांचे दिवे उजेडासाठी वापरता येतील.

**वीजः**

नेमकी किती वीज राष्ट्रीय वीजेच्या जाळयामधून घ्यावी लागेल, या विषयी मी आज अनभिज्ञ आहे. घर गरम

ठेवणं आणि स्वयंपाक हे या संदर्भातले मुख्य प्रश्न आहेत. मी सरासरी ०.१ युनिट वीज रोज वापरतो. त्यात उजेड, संगणक, कर्मशाळेतली यंत्रं आणि पाण्याचा पंप वापरता येतात. रोजच्या जादा ०.०५ युनिट्समधे मी टी.व्ही. सुद्धा वापरू शकेन. चार जणांचं एक कुटुंब ४०० मेगा जूल प्रतिवर्षी ऊर्जा वापरेल असा अंदाज आहे. यात इस्त्री, फरशी घासण्याचं यंत्र, विजेची स्वयंपाक शेगडी किंवा धुलाई यंत्राचा वापर अपेक्षित नाही. त्यात फ्रिजही अपेक्षित नाही. सध्या मी गॅसवर चालणारा फ्रिज वापरतो. पण बाहेरून ऊर्जा पुरवावी लागत नाही असा बाष्पिभवनाच्या (माठाच्या) तत्वावर चालणारा फ्रिज वापरणं मी लौकरच चालू करणार आहे.

बॅटरीज् वापरण्याऐवजी उंचीवर पाण्याच्या टाक्या भरून ठेवणं तितकच सोयीचं आणि कार्यक्षम ठरू शकेल असा अंदाज आहे. नव्या संस्कृतीतल्या वस्त्यांमधे अनेक छोटे बंधारे आणि छोटी धरणं असणार आहेत.

**स्वयंपाक आणि घर गरम ठेवणे:**

प्रचंड बचत आणि विचारपूर्वक आखणी केलेली यंत्रणा यांच्यामुळे हा ऊर्जाखर्च किमान पातळीवर आणता येईल. पाण्याचं जाकीट घातलेले लाकडाचे स्टोव्हज् वापरले की उष्णता ऊर्जेची मोठी बचत होईल. वातावरण उबदार राखता येईल. सामुदायिक कचरा-पाचकातून येणारा मिथेन लहानसहान पाकसिद्धीसाठी वापरता येईल. पाव तयार करण्यासाठी घरगुती किंवा सामुदायिक लाकूड-भट्टीचा वापर करता येईल. मांसाहारात घट आणि ताजी फळं, भाज्या वगैरेचं थेट सेवन यामुळे स्वयंपाकघरातल्या ऊर्जेची मागणी कमी होईल. इमारती मातीच्या असल्यामुळे मुळातच उष्णतारोधक असतील आणि उबेसाठी कमी ऊर्जा मागतील.

जागतिक पातळीवर लाकूडफाटा वापरण्याचा पर्याय थोडा अडचणीचा आहे. एकूण उष्णता ऊर्जेची गरज पहाता (१८ युनिट्स प्रतिकुटुंब प्रतिदिन), १० अब्ज लोकांच्या जगाला अतिशय वेगानं वाढणाऱ्या झाडांच्या लाकडासाठी ६८०० लाख हेक्टर (१ हेक्टर म्हणजे १ लाख चौरसफूट) जमीन गरजेची असेल. पण याच पैकी काही जमिनीवर लाकूड वाढवण्याशिवाय इतर अनेक गोष्टी (उदा. पाणी अडवणं, चराऊ कुरणं वाढवणं) एकाच वेळी होऊ शकतील. त्यामुळे एवढी जमीन उपलब्ध होणं अशक्य नाही. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात इतर सर्व ऊर्जांना (विशेषतः नूतनीकरण करता न येण्यासारख्या पेट्रोल इ.) पर्याय निर्माण होईल.

जैविक इंधनं तयार करणारी झाडं वाढवणं मात्र जमिनीच्या दृष्टीनं अशक्य वाटतं. कारण ही झाडं तुलनेनं जास्त जमीन मागतात.

विविध ऊर्जांचा विचार करता आज (२०११ साली) ऑस्ट्रेलियात प्रतिव्यक्ती प्रतिवर्षी ऊर्जा ३००,००० मेगा जूल आहे. नव्या संस्कृतीत हीच ऊर्जा १५,००० मेगा जूल येते. म्हणजे आजच्या चंगळवादी उपयोगाच्या तुलनेत ही केवळ ५% आहे.

**डॉलर मधील दरडोई खर्च:**

वर उल्लेख केलेल्या विविध खर्चांचा विचार करूता तो ५००० डॉलर प्रतिव्यक्ती प्रतिवर्षी असेल असा अंदाज करता येईल. हे प्रमाण आजच्या सरासरी ऑस्ट्रेलियन पगाराच्या फक्त १० % आहे. यात अपघात, विमा, कर या सारख्या काही खर्चांचा अंतर्भाव करावा लागेल.

# फारच साधं आणि काटेकोर ?

वरचं सगळं विवेचन फारच साधं आणि काटेकोर (austere) आहे असं वाटतं आहे का ? अनेकांना ते स्वीकारार्ह वाटणारही नाही. पण मुलं अशाच वातावरणात जर वाढली तर त्यांना तसं वाटणार नाही. त्यांना ही जीवनपद्धती आनंददायक उपक्रमांनी भरलेली जाणवेल. चंगळवादाचा अंत लौकरच, होणारच आहे. पण दरम्यानच्या काळात, आपण हे दाखवून दिलं पाहिजे की हाच नवा मार्ग चंगळवादींनी दिलेल्या खोट्या वचनांपेक्षा जास्त फलदायी आहे.

# निष्कर्षः

नवी साधी संस्कृती उपभोगाच्या साधनांमधे पुढे दिलेल्या मार्गांनी कपात करू शकतेः

- **पुढील उद्योग हळूहळू बंद करूनः** स्पोर्ट्स् कार, स्पीड बोट्स्, पुष्पोद्योग (आपण बागांमधेच राहणार आहोत), जाहिरात, बाटलीबंद पाणी, फॅशन उद्योग, कार शर्यती, स्पर्धात्मक खेळ, रत्नं आणि मूल्यवान धातु, लष्कर.
- **पुढील उद्योग कमी करूनः** जहाजे, विमाने, लॉन मोवर, कीटकनाशकं, खतं, अर्थोद्योग-कर्जोद्योग, प्रवास-उद्योग, वेष्टन उद्योग, शेती-उद्योग (शेती नव्हे), ट्रक, विमा, माहिती तंत्रज्ञान, अवजड यंत्रं, महामार्ग, पूल, कोर्ट कचेऱ्या, तुरुंग, पोलीस, समुपदेशन आणि मानसशास्त्रीय उपाययोजना, मद्य आणि अंमली पदार्थ, अपघात इस्पितळं वगैरे.
- **नव्या व्यवस्थे मुळे होणारी बचतः** घर छोटं केलं किंवा अन्न स्थानिकरित्या पिकवलं की ट्रक आणि जहाजं यांची गरजच रहाणार नाही. टि.व्ही. समोर बसण्याऐवजी लोक जेव्हा कार्य-कर्ते नागरिक होतील त्यावेळी अनेक खाजगी कंपनी-पुरस्कृत सेवा बंद होतील.
- **सामाजिक आणि पर्यावरणीय दुरुस्त्या कमी कराव्या लागतीलः** समाज आणि पर्यावरण तंदुरुस्त असल्यामुळे कायदेकानू, महागडी आरोग्य सेवा, न्यायालयं, तुरुंग, मानसिक आजारावर उपाय, शस्त्रास्त्रं यांची गरज कमी भासेल.
- **प्रत्येक उत्पादनाच्या किंमतीत सहभागी असलेली अतिरिक्त किंमत नष्ट होईलः** जाहिरात, विमा, वेष्टन, कर्जावरील व्याज, मुख्याधिकाऱ्यांचे (CEO) प्रचंड पगार, सल्ला सेवा, बँक शुल्क, वकील शुल्क कमी किंवा नष्ट होईल. त्याशिवाय उत्पादनं टिकण्यासाठी तयार केली जातील त्यामुळे उत्पादनवाढ रोखली जाईल.
- **यांची गरज नसेलः** नोकरशाही, खास व्यावसायिक, कार्यालयं, व्यवस्था, सल्ला, संगणक, उंची सूट्स्, यांची गरज नसेल. कारण स्थानिक पुरवठादार, स्वयंसेवी व्यवस्थापक अनेक सेवा आणि वस्तू नागरिकांपर्यंत पोचवतील.

"साधे जीवन" एक प्रकारची आत्मिक क्षमता विकसित करेल. उत्साह, मोकळा वेळ, ऊर्जा, सत्-असत्

विवेकबुद्धी, विचारशीलता, सतत सुधारणा-उत्क्रांती हे प्रत्येकाचे गुण असतील. कारण हे नागरिक आनंदी, सुरक्षित, सहकार्याची भावना असलेले, परिस्थितीवर-आयुष्यावर नियंत्रण असलेले, श्रमदानासाठी उत्सुक असलेले स्वयंसेवक असतील. या सगळ्याची तुलना आजच्या निरुत्साही, टी.व्ही. पहाण्यातच वेळ घालवणाऱ्या, तणावग्रस्त, उंदरांसारख्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या, घराघरात एकटेपणाने दडलेल्या आणि काहीही सामाजिक बांधिलकी नसलेल्या लोकांशी करून पहा.

हे सगळं बदलता येईल. काहीही संपत्ती किंवा संसाधनं खर्च न करता...हा सम्यक्-विकास स्वयंस्फूर्त चर्चा करणारे आणि कृतिशील स्वयंसेवक यांच्या माध्यमातून होईल. त्यासाठी फक्त मानवी ऊर्जेचा वापर केला जाईल.

**सकृद्दर्शनी असं दिसतं की सध्याच्या १० % खर्चात, सध्याच्या १० % ऊर्जा आणि इतर संसाधनं वापरून सफल आयुष्य सर्वांना जगता येईल. मात्र त्यासाठी नव्या "साधे जीवन" संस्कृतीकडे जाणारं परिवर्तन स्वीकारलं पाहीजे.**